www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ४९ मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## १९ वर्षे अखंडित सुरु असणाऱ्या साप्ताहिक कोकण संध्या दिवाळी अंकाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शुभहस्ते प्रकाशन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

गेली १९ वर्षे न चुकता प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक कोकण संध्या वृत्तपत्राच्या सन २०२५ च्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन सोहळा रायगडचे भाग्यविधाते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शुभहस्ते त्यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस शिवदास कांबळे ,पनवेल महानगर पालिका रिपाई जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कांबळे रायगड जिल्हा कार्यध्यक्ष अमोल इंगोले ,माजी नगराध्यक्ष संदीप पाटील ,भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष माजी नगरसेवक गणेश कडू, रिपाई पनवेल शहर कार्याध्यक्ष मोहन गायकवाड, जेष्ठ पत्रकार व कोकण संध्याचे संपादक दिपक महाडिक, पत्रकार संजय कदम, निलेश सोनावणे, संतोष आमले, रवींद्र गायकवाड, लालचंद यादव, शंकर वायदंडे, अण्णा आहेर, राजेंद्र कांबळे, सुनील वारगडा, दीपक महाडिक, केवल महाडिक, शैलेश चव्हाण, नितीन जोशी, निखिल गुंदेच्छा, अनुराग वाघचौरे, शशिकांत दळवी आदी उपस्थित होते.

# नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी भारत सज्ज - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

## ‘इंडिया मेरीटाईम वीक - २०२५’ चे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

मुंबई हे भारताच्या सागरी क्षेतातील महत्वाचे स्थान असून ‘इंडिया मेरीटाईम वीक- २०२५’ च्या निमित्ताने मुंबईमध्ये भारत नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी सज्ज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. तर मुंबई ही देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी नेस्को, गोरेगाव येथे आयोजित ‘इंडिया मेरीटाईम वीक- २०२५’ या आंतरराष्ट्रीय सागरी परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.




या वेळी केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

उद्घाटन सोहळ्यास केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन शरण मांझी, केंद्रीय राज्यमंत्री शंतनु ठाकूर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि केंद्रीय सचिव विजय कुमार, आदी मान्यवर उपस्थित होते.‘इंडिया मेरीटाईम वीक २०२५’ च्या निमित्ताने आज जगभरातील सागरी तज्ज्ञ, उद्योगपती आणि प्रतिनिधी भारतात एकत्र आले असल्याचे सांगून, केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह म्हणाले की, ‘गेटवे ऑफ इंडिया’ आता ‘गेटवे ऑफ द वर्ल्ड’ बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारताचा ११ हजार किलोमीटरचा किनारा आता जागतिक विकास केंद्र होत आहे. सागरी क्षेत्र देशाच्या ‘जीडीपी’त ६० टक्क्यांहून अधिक योगदान देते. पाच हजार वर्षांपूर्वीपासून भारत सागरी व्यापारात अग्रस्थानी होता. आज इंडो-पॅसिफिक क्षेत्रात भारत पुन्हा आपली सागरी ताकद सिद्ध करत आहे. सागर, सागरमाला, गतिशक्ती आणि समुद्रयान यासारख्या प्रकल्पांमुळे सागरी पायाभूत सुविधांना नवे बळ मिळाले आहे. भारत जहाजबांधणीत जगात पाचव्या क्रमांकावर असून नवीन बंदरांचीही उभारणी वेगाने सुरू असल्याचे ते म्हणाले.केंद्रीय गृह व सहकार मंत्री शाह म्हणाले की, देशातील ९० टक्के व्यापार सागरी मार्गाने होतो. २०४७ पर्यंत भारत जागतिक सागरी नेतृत्व प्राप्त करण्याचे ध्येय आहे. वाढवण बंदर लवकरच जगातील टॉप १० बंदरांमध्ये गणले जाणार आहे. ग्रेट निकोबार व कोचिन बंदरात नव्या गुंतवणुकीची प्रक्रिया सुरू आहे. मच्छीमारांच्या सुरक्षेसाठीही सरकारने ठोस उपाययोजना केल्या आहेत. जागतिक गुंतवणूकदारांनी भारताच्या सागरी क्षेत्रात सहभागी होऊन आपल्या आणि भारताच्या समृद्धीचा मार्ग प्रशस्त करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**महाराष्ट्र देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भारत आणि महाराष्ट्राकडे विविध क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत नव्या ‘मेरीटाईम पॉवर’च्या रूपात उभा राहत आहे.

महाराष्ट्र देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू आहे असे सांगून या प्रवासात गुंतवणूकदारांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद होणार नाही; देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद होणार या विरोधकांच्या आरोपाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट उत्तर दिले. लाडकी बहीण योजना कधीच बंद होणार नाही, असे स्पष्ट करत मुख्यमंत्र्यांनी लाडक्या बहिणींना दिलासा दिला आहे.विधानसभा निवडणुकीआधी जुलै २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. त्यानंतर २ कोटी ६२ लाख महिलांनी अर्ज केले. अर्जांची छाननी प्रक्रिया केली असता विविध कारणांमुळे १० लाखांहून अधिक महिला अपात्र ठरल्या. त्यामुळे सद्यस्थितीत




२ कोटी ४७ लाख पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात प्रति लाभार्थी १५०० रुपये जमा होत आहेत. मात्र आगामी निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजना बंद होणार, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने होत आहे.महायुती सरकारने जाहीर केलेल्या कुठल्याही योजना बंद करायच्या नाहीत. त्यामुळे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद होणार अशी ओरड विरोधक करत असले तरी ही योजना बंद होणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.पाच वर्षांनी आमचे कॉन्ट्रॅक्ट तुम्ही रिन्यू केले तर अजून पाच वर्षांपर्यंत तुम्हाला सवलत देऊ, असेही ते म्हणाले. लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. फलटण येथील कार्यक्रमात ते बोलत होते.

**शेतकऱ्यांसाठी सर्वात मोठे पॅकेज!**

आपले महायुतीचे सरकार आहे, ते विकासाचा विचार करणारे सरकार आहे. आम्हाला समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास हवाय. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांवर संकट आल्यानंतर आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठे ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले.

## जळगाववरून आता दररोज विमानसेवा सुरू; जळगाव-मुंबई आणि जळगाव-अहमदाबाद प्रवासी सेवा

**दैनिक युवक आधार**
**जळगाव**

प्रवाशांच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद देताना जळगाव विमानतळावरून जळगाव-मुंबई आणि जळगाव-अहमदाबाद दरम्यानची विमानसेवा आजपासून दररोज सुरू झाली आहे. यामुळे व्यापारी, उद्योजक तसेच सर्व प्रवाशांना मोठा लाभ होणार आहे.

आधी जळगाव-मुंबई सेवा आठवड्यात केवळ चार दिवस उपलब्ध होती. प्रवाशांच्या मागणीमुळे ही सेवा आता दररोज सुरू करण्यात आली आहे. तर, गेले दोन महिने बंद असलेली जळगाव-अहमदाबाद सेवा देखील आजपासून पुन्हा सुरू करण्यात




आली आहे.

या मार्गावर मुंबईहून येणारे विमान जळगाव मार्गे अहमदाबादला जाईल आणि परत जळगाववर येऊन मुंबईसाठी रवाना होईल. विमान कंपनीकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे ६०% प्रवासी आधीपासून तिकीट बुक करत आहेत, त्यामुळे या सेवेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. दिवाळीच्या काळात या मार्गावर तिकीटे उपलब्ध नव्हती.

जळगाव विमानतळाचा फायदा जळगाव, धुळे, बुलढाणा जिल्ह्यांतील प्रवाशांना होत आहे. सद्यस्थितीत उडान योजनेअंतर्गत गोवा, पुणे, हैदराबाद, मुंबई, अहमदाबाद या शहरांसाठी सेवा सुरू असून त्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर दिल्ली, जयपूर आणि इंदूरसाठी विमानसेवेचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

## डॉ.बावदानकर यांच्या भक्तिवेदांत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल स्थलांतर व लोकार्पण सोहळा आ.सुरेश धस यांच्या हस्ते संपन्न

**जिथे पिकते तिथे विकत नाही” ही म्हण आपल्या लोकांमध्ये प्रसिद्ध आहे; मात्र याला अपवाद म्हणजे डॉ.बावदानकर सुरेश धस**

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

आष्टी तालुक्यातील बावी/कोहिनी येथे स्थानिक डॉ.पुरुषोत्तम बावदानकर यांनी स्थापन केलेल्या भक्तिवेदांत मल्टीस्पेशालिटी लोकार्पण व हॉस्पिटलच्या नवीन इमारतीचे उद्घाटन समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पक्षाचे आ.सुरेश धस हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला,वडवणी येथील निधन झालेल्या प्रख्यात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.संपदा मुंडे यांना सर्वांनी कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजली वाहिली.

**ग्रामीण भागातील उत्कृष्ट आरोग्यसेवेचा आदर्श**

डॉ.बावदानकर यांनी 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या तत्त्वावर विश्वास ठेवून बावी/कोहिनी परिसरात मागील तेरा वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली आहे. 'जिथे पिकते तिथे विकत नाही' या म्हणीला अपवाद ठरवून,त्यांनी आपली जन्मभूमीच कर्मभूमी मानली आणि आई-वडिलांच्या आदर्शांना चिकटून राहून,ग्रामीण भागातील लोकांसाठी हे भव्य रुग्णालय उभारले. कोरोनाच्या काळात पंचक्रोशीतील असंख्य लोकांचे जीव वाचवले.या भागात





फॅमिली डॉक्टर म्हणून पुरुषोत्तम यांची ओळख या हॉस्पिटलमुळे बावी,कोहीनी सांगवी, पाटण,डोईठाण,सुरुडी,हातोला, पाटसरा,कापसी,नागतळा,वेतळवाडी, किन्ही,बीड सांगवी खिळद,कारखेल बुद्रुक यासह पंचक्रोशीतील हजारो नागरिकांना उत्कृष्ट आरोग्यसेवा मिळणार आहे.कार्यक्रमा वेळी आलेल्या प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते आरोग्य नगर नामकरण करण्यात आले.

**मान्यवरांचे आशीर्वाद आणि मनोगत**

या उद्घाटन प्रसंगी आ.सुरेश धस, आ. बाळासाहेब आजबे,अजय धोंडे,ॲड भाऊसाहेब लटपटे,सरपंच अशोक जेधे, अजिनाथ सानप यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तर महंत काशिनाथ महाराज शास्त्री,सुदर्शन महाराज उदासीन, रामदास महाराज गर्जे यांसह अनेक धर्माचार्यांनी या समाजहितैषी प्रकल्पाला आशीर्वाद दिले.

**मोठ्या संख्येने उपस्थिती**

या ऐतिहासिक कार्यक्रमाला आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आ.सुरेश धस,माजी आ.साहेबराव दरेकर,मा.आ. बाळासाहेब आजबे,राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, मा.जि.प सदस्य सतीश शिंदे,युवा नेते अजय धोंडे, मा.जि.प सदस्य सुभाष क्षीरसागर, एन.टी गर्जे,युवा नेते अमोल तरटे , सरपंच परिषद अध्यक्ष दत्ता काकडे,ह.भ.प.काशिनाथ महाराज, ह.भ.प.सुदर्शन महाराज,ह.भ.प. काशिनाथ महाराज शास्त्री,ह.भ.प. देविदास महाराज गर्जे,ह.भ.प. कल्याण महाराज कोल्हे,ह.भ.प.आप्पा महाराज भगत, ह.भ.प.रोहिदास महाराज गर्जे,

ह. भ.प.अतुल महाराज शास्त्री डॉ राहुल टेकाडे, डॉ अशोक गांधी, डॉ राम सानप ,डॉ राजकुमार गायकवाड,डॉ शिवाजी राऊत,डॉ मधुकर हंबर्डे,डॉ अभय म्हस्के,डॉ झांजे,डॉ नदीम शेख , डॉ शरद गर्जे,डॉ युवराज तरटे,डॉ गोल्हार,डॉ.हारकर डॉ अमित डोके,मोहन जगताप,रावसाहेब देशमुख.सरपंच दत्तात्रय खोटे,सरपंच नवनाथ गर्जे, सरपंच दादा जगताप,सरपंच अशोक गर्जे, सरपंच मोहन आमटे,पोपट भाऊ गर्जे,रेवणनाथ खाडे,संदीप खलाटे,रमेश खलाटे,शेख आफसर,अश्रुबा लटपटे, एम डी लटपटे,आष्टी तालुका युवा पत्रकार संघ,अध्यक्ष अविनाश कदम,पत्रकार संतोष दाणी, बा.म पवार पत्रकार समीर शेख,जावेद पठाण,अक्षय विधाते,दादा पवळ,मारुती सत्रे,सुरेश कांबळे,आण्णासाहेब साबळे सर्व डॉक्टर असोसिएशन,पंचक्रोशीतील सर्व सरपंच,उपसरपंच,ग्रामस्थ, नातेवाईक,मित्रपरिवार व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. बावदानकर यांच्या समाजसेवेचा गौरव केला.

सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर सर व महेश शिंदे सर यांनी केले तर आलेल्या मान्यवरांचे आभार समाजसेवक समीर शेख यांनी मानले.

## नवीन पनवेलच्या उड्डाणपुलाला लागूनच असलेला अपघाताचा स्क्रीन फलक?

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

नवीन पनवेलच्या उड्डाणपुलाला लागूनच पनवेल महानगरपालिकेने लावलेला स्क्रीन बोर्ड (फलक) हा असलेला अपघाताचा फलक? होऊ शकतो, त्यामुळे या ठिकाणी स्क्रीन बोर्ड लावू नये अशी मागणी पनवेलकर नागरिकांकडून होत आहे.नवीन पनवेलहून पनवेलकडे येणाऱ्या उड्डाणपूलावरुन (उतारावर) येत असताना डाव्या बाजूकडे उड्डाणपूलाला लागूनच असलेल्या ठिकाणी पनवेल महानगरपालिकेने जाहिरातीचा जो स्क्रीन बोर्ड लावला



आहे,तो बोर्ड अपघाताचा बोर्ड होऊ शकतो? या स्क्रीन बोर्डावर अजूनही जाहिराती सुरू केल्या नसल्यातरी उड्डाणपूलावरून पनवेलकडे येताना वाहन चालकांचे लक्ष या स्क्रीन बोर्डकडे जाणार,स्क्रीन बोर्डवरील जाहिराती आणि लख्ख प्रकाश वाहन चालकांचे लक्ष वेधणार, उड्डाणपूल आणि स्क्रीन बोर्ड यामध्ये कमी अंतर असल्याने,त्यात उतार,अशा वेळेस अपघात होण्याची शक्यता आहे. पनवेल महानगरात खड्ड्यांचे साम्राज्य असून त्याकडे प्रशासनाचे लक्ष नाही मात्र पनवेल महानगरपालिकेने जिथे जागा मिळेल तिथे स्क्रीन बोर्ड लावण्याचा धडका लावला आहे.परंतु हा स्क्रीन फलक लावू नये, कोणतीही अपघाताची दुर्घटना होऊ नये म्हणून,हा स्क्रीन बोर्ड लावू नये अशी नागरिकांची मागणी आहे.

## जे एन पी ए.विद्यालयातील शिक्षिका प्रमिला पवार यांच्या 'ज्ञानबिंदू' पुस्तकाला साहित्य गौरव पुरस्कार प्राप्त




**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

रविवार दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी कवयत्री शांता शेळके प्रतिष्ठान मंचर,पुणे यांच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय साहित्य कृती या पुरस्कारासाठी राज्यभरातून आलेल्या विविध साहित्य कृती मधून जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयातील शिक्षिका प्रमिला पवार यांनी लिहिलेल्या "ज्ञानबिंदू" या पुस्तकाला 'साहित्य गौरव "पुरस्कार प्राप्त झाला आहे.

प्रमिला पवार मॅडम यांच्या या साहित्य क्षेत्रातील घोडदौडीच्या सन्मानार्थ आज सन्माननीय डॉक्टर श्रीपाल सबनीस ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक यांच्या शुभहस्ते प्रमिला संतोष पवार यांना कवयित्री शांता शेळके साहित्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयातील शिक्षिका प्रमिला संतोष पवार यांचे सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मावळा ब्रिगेड आयोजित रक्तदान शिबिरात 109 रक्तदात्यांनी केले रक्तदान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

मावळा ब्रिगेड (नवी मुंबई), मैत्र प्रतिष्ठान (घोडपदेव-भायखळा) आणि एम.एस पि फॉउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विध्यमानाने आयोजित रक्तदान शिबीर व महाआरोग्य शिबीर चे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या हस्ते उदघाट्न झाले.

यावेळी एकूण 109 रक्तदाते रक्तदान शिबिरामध्ये सहभागी झाले, तसेच 349 जणांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.



यावेळी कामोठे शहर मंडल भाजप अध्यक्ष विकास घरत, डॉ.विठ्ठल काळे, दहशतवाद विरोधी पथकाचे बलराज गणप साळोखे, व्यापारी संघटना कामोठे अध्यक्ष नाना मगदूम, मावळा ब्रिगेडचे मार्गदर्शक गणेशशेठ बेरगळ, सल्लागार रवी कदम, पवनकुमार बेरगळ, पांडुरंग यमगर, सुशांत काटकर, कैलाश सरगर, जे जे रुग्णालयचे श्री कदम, श्री. सूर्यवंशी यांच्यासह शिवसेना शहरप्रमुख रामदास गोवारी, उपशहरप्रमुख सचिन त्रिमूखे, राष्ट्रवादी काँग्रेस पदवीधर सेल जिल्हाध्यक्ष स्वप्नील काटकर, भाजपा जिल्हा सरचिटणीस विद्या तामखडे, एमएसपि फॉउंडेशन संस्थापक मायाप्पा बुधे, मैत्र प्रतिष्ठान कार्याध्यक्ष विशाल बाबर, खजिनदार विलास जाधव, मावळा ब्रिगेडचे संस्थापक संदिप वावरे, सेक्रेटरी लक्ष्मण कारंडे, खजिनदार महेंद्र हिरे , कार्याध्यक्ष दिनेश निलख, उपाध्यक्ष योगेश निलख, उपसेक्रेटरीसंदिप साळुंखे, उपखजिनदार सचिन शेंबडे, रोहीत कोळेकर यांच्यासह मावळा ब्रिगेडचे सर्व शिलेदार उपस्थित होते.

## सेलू उपजिल्हा रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर ठप्प,एसी बंद असल्याने शस्त्रक्रिया थांबल्या

### ऑपरेशन थिएटरमधील एसी बंद; डॉक्टर अन् रुग्णाच्या जोखमीवर दोन शस्त्रक्रिया कुलरवरच पाडल्या पार

**दैनिक युवक आधार**
**शिवाजी पवार सेलू (प्रतिनिधी)**

सेलू येथील उपजिल्हारुग्णालयात बारा दिवसांपासून ऑपरेशन थिएटरमधील एअर कंडिशनर (AC) बंद पडल्याने शस्त्रक्रिया विभाग ठप्प झाला आहे.त्यामुळे सिझेरियनसह सर्व शस्त्रक्रिया तात्पुरत्या थांबविण्यात आल्या असून,रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.एसी बंद झाल्याने ऑपरेशन थिएटरमधील तापमान वाढले आहे त्यामुळे निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक अटी पूर्ण होत नसल्याने संसर्गाचा धोका संभवत असल्याने प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून शस्त्रक्रिया विभाग बंद ठेवण्याचा निर्णय




घेतला आहे.यामुळे सिझेरियनसाठी येणाऱ्या गर्भवती महिलांना सध्या खासगी रुग्णालय किंवा परभणी येथील जिल्हा रुग्णालयात पाठविले जात असून,शासनाची १०२ रुग्णवाहिका सेवा उपलब्ध असली तरी देखील, रुग्णालयापर्यंतचा प्रवास,विलंब आणि खर्च यामुळे महिलांना व तसेच त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.तसेच सरकारी रुग्णालयातील शस्त्रक्रिया सेवा ठप्प झाल्याने गरीब व ग्रामीण भागातील रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे वळावे लागत आहे.त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक भार वाढला असून,शासनाच्या मोफत वैद्यकीय सेवेवरील त्यांचा विश्वास ढळू लागला आहे. यासंदर्भात उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ.संतोष देशमुख यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की,ऑपरेशन थिएटरमधील एसी दुरुस्तीचे काम सुरू असून, दोन ते तीन दिवसांत एसी पुन्हा कार्यान्वित होईल. त्यानंतर शस्त्रक्रिया विभाग सुरू करण्यात येईल. मात्र, प्रत्यक्ष पाहणी करता कामात विशेष गती दिसून येत नसल्याची,नागरिकांची तक्रार आहे. यासंबंधी स्थानिक नागरिक,सामाजिक कार्यकर्ते व रुग्णांचे नातेवाईक यांनी या निष्क्रिय प्रशासनावर संताप व्यक्त केला असून.सरकारी रुग्णालयात एसी सारख्या प्राथमिक सुविधा बिघडलेल्या असताना देखील दुरुस्तीला विलंब होणे म्हणजे गंभीर बाब असून.यासाठी जबाबदारांवर कारवाई व्हावी,अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.शस्त्रक्रिया विभाग ठप्प राहिल्याने केवळ सेलू तालुक्यातीलच नव्हे तर परिसरातील अनेक गावांतील रुग्णांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने तातडीने कारवाई करून एसी दुरुस्त करून शस्त्रक्रिया सेवा लवकरात लवकर सुरू करावी,अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

## मुदखेड येथे युवक काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**

येणाऱ्या स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुदखेड येथील विश्रामगृहावर युवक काँग्रेसची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाढे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत आगामी निवडणुकीसाठी संघटनात्मक बांधणी, युवकांचा सहभाग आणि प्रचाराच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी नुकतेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्त झालेले आदरणीय यशपाल भिंगे साहेब यांचा युवक काँग्रेसच्या वतीने सत्कार करण्यात आला

बैठकीदरम्यान युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी नव्या नेतृत्वाला शुभेच्छा देत पक्ष बळकटीसाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

युवक काँग्रेसचे एकत्रित प्रयत्न आणि नव्या जोशाने येणाऱ्या निवडणुकीत काँग्रेसचा विजय निश्चित असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीतर्फे पनवेल पोलिस उपायुक्त यांना निवेदन




**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना महिला आघाडी पनवेल यांच्या वतीने व उपजिल्हा संघटिका रेवती सकपाळ यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मार्फ़त पनवेल पोलिस उपायुक्त यांना फलटण जिल्हा सातारा उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा कथित सहभाग व दरम्यान झालेल्या गंभीर प्रशासकीय त्रुटींच्या पार्श्वभूमीवर तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

यावेळी विधानसभा संघटिका सुजाता कदम, कळंबोली शहर शहरसंपर्क संघटिका समीक्षा खांदा कॉलनी शहर संपर्क संघटिका अर्चना शिरसागर, पनवेल शहर संघटिक अर्चना कुलकर्णी कामोठे शहर संघटिका संगीता राऊत, नवीन पनवेल शहर संघटिका मालती पिंगळे, खांदाकॉलनी शहर संघटिका सौ. सानिका मोरे, कळंबोली शहर संघटिका ज्योती मोहिते, खांदा कॉलनी उपशहर संघटिका स्मिता घाडगे, पनवेल उपशहरसंघटिका उज्वला गावडे, कामोठे उपशहर संघटिका सुरेखा जाधव, कळंबोली उपेशशहर संघटिका निशा जाधव आदि पदाधिकारी उपस्थित होते.

## कर्जत तालुका भाजपा चिटणीसपदी सारंग घोडेस्वार यांची दुसऱ्यांदा फेरनिवड

**दैनिक युवक आधार**
**कर्जत सतीश शिंदे प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील रहिवाशी सरपंच सारंग घोडेस्वार यांची विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी भाजपा चिटणीस पदी फेर निवड केली असून त्यांच्या या निवडीमुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये मिरजगाव गटासहित कर्जत तालुक्यात भाजपाला मोठा फायदा होणार असून त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे घोडेस्वार यांचा दांडगा जनसंपर्क असल्याने त्यांना या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे राम शिंदे यांचे कट्टर समर्थक मानले जातात त्यांच्या या निवडीबद्दल मिरजगाव गटातील नेते तथा भावी जिल्हा परिषद



सदस्य संपतराव जी बावडकर डॉक्टर पंढरीनाथ आबा गोरे मिरज गावचे विद्यमान सरपंच नितीनजी खेतमाळीस भाजपा नेते संजय शेलार उपसरपंच लहुजी वतारे अतुल राजे जाधव

निवृत्ती जवणे पोपटराव कोरडे शंकर धतुरे दादासाहेब तनपुरे आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती या सर्व नेत्यांनी या निवडीबद्दल त्यांचा सत्कार केला असून आगामी काळात पक्षाचे काम एकनिष्ठेने करून पक्ष वाढीचे काम जोमाने करेल असा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला

घोडेस्वार यांचा जनसंपर्क दांडगा असून त्यांचा मित्रपरिवार खूप मोठा आहे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत उमेदवार निवडून येण्यासाठी निश्चितच फायदा होईल असा विश्वास माझी पंचायत समिती सदस्य डॉक्टर पंढरीनाथ आबा गोरे यांनी व्यक्त केला.

## डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी - डॉ.राजेंद्र सानप

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**



काळजाला पिळ पडणारी घटना डॉ.संपदा मुंडे यांची आत्महत्या नसून ही एक प्रकारे व्यवस्थेने केलेली हत्याच आहे. शारीरिक आणि मानसिक छळ होत असल्याची वेळीच तक्रार देवुन व वरिष्ठांना सांगून ही वेळीच तक्रारीची दखल घेतली गेली नाही म्हणून डॉ.संपदा मुंडे यांनी आत्महत्या केली. भ्रष्ट, उन्मत्त, मग्रूर पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने याने अनेक वेळा मानसिक त्रास दिल्याचे उघड झाले आहे. एका खासदारांनी पी.ए.च्या माध्यमातून मेडिकल रिपोर्ट बदलण्यासाठी प्रचंड दबाव आणुन त्रास दिला. या सर्व घटना साखळी पद्धतीने करणाऱ्या टीम मध्ये प्रशांत बनकर व या सारख्या अनेक नाराधमाचा ही समावेश आहे. या सर्वांच्या जांचाला कंटाळून न्याय मिळत नसल्याने हाताशी होवुन डॉ.संपदा मुंडे यांनी स्वतः ला संपवले. ही अतिशय गंभीर आणि चीड आणणारी संतापजनक बाब असून या घटनेची सखोल चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी. या घटनेची एस आय टी च्या माध्यमातून चौकशी व्हावी. संबंधित गुन्हेगारांना या प्रकरणातील खासदाराला, अधिकारी यांना सरकारने अभय देवु नये या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी. स्व.डॉ.संपदा मुंडे कुटुंबाला न्याय मिळावा. अशी मागणी शासनाकडे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक डॉ.राजेंद्र सानप यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## भव्य संकीर्तन जागृती यात्रा सोयगावात उत्साहात पार;भर पावसातही भक्तांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :-** संत श्री आसारामबापू यांच्या पावन प्रेरणेने दरवर्षी दिवाळीनिमित्त सुरतमार्गे देशभरातील गावोगावी व शहरांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य संकीर्तन जागृती यात्रेचे आयोजन यंदा सोयगाव शहरात दि.२७ ऑक्टोबर २०२५ रोजी वार रविवारी सायंकाळी करण्यात आले. यावेळी सोयगाव कर्तव्यदक्ष नगरसेवक हर्षल (बंटी) काळे यांच्या हस्ते महापुजा व आरती करण्यात आली.व यात्रेला सुरुवात करण्यात आली.भर पावसातही भक्तांचा उत्साह कमी झाला नाही. "हरी ओम" च्या जयघोषात व भजन-कीर्तनाच्या गजरात संकीर्तन यात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरून निघाली. टाळ, मृदुंग, झांज यांच्या निनादात



वातावरण भक्तिमय झाले होते.यावेळी संत आसाराम बापू यांच्या 'कृषी प्रसाद' या पुस्तकाचे भक्तांना वाटप करण्यात आले. या ग्रंथाद्वारे संतांनी दिलेले नैसर्गिक शेती, साधना आणि संतुलित जीवनाचे संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आले.कार्यक्रमास साधक, महिला वर्ग व बालभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले व भक्ती भावनेतून कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी श्री योग वेदांत समिती सोयगाव तालुका अध्यक्ष विजय अहिरे, विष्णू शेठ दुसाने, विश्वनाथ चौधरी, कैलास आगे ,आकाश वाडेकर, संभाजी मानकर, सुरेश ताडे, अशोक घनगाव ,जितेंद्र राठोड,भास्कर ढगे ,कृष्णा राऊत, एकनाथ फरकाडे, प्रवीण पाटील, शांताराम ताडे ,कृष्णा चौधरी ,रामदास फुसे मुख्याध्यापक संजय ताडे,सुधीर पठाडे ,सुसर साहेब अदीची उपस्थिती होती.

## यंदा वाढदिवस साजरा करणार नाहीत - खा. अशोकराव चव्हाण यांचा निर्णय

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**

यावर्षीच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे मराठवाड्यासह नांदेड जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिक मोठ्या संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि खासदार अशोकराव चव्हाण यांनी यंदा आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे.

समाजमाध्यमांद्वारे दिलेल्या संदेशात खा. चव्हाण यांनी म्हटले आहे की, "शेतकऱ्यांच्या दु:खाच्या काळात वाढदिवस साजरा करणे उचित ठरणार नाही. त्यामुळे कोणीही केक, मिठाई, हार-तुरे किंवा पुष्पगुच्छ घेऊन येऊ नयेत, ही नम्र विनंती आहे."



तसेच वाढदिवसाच्या दिवशी ते आपल्या कुटुंबासह देवदर्शनासाठी जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

"जनतेचा स्नेह, सदिच्छा आणि सहकार्य हेच माझ्यासाठी सर्वात मोठे बळ आहे. ते भविष्यातही कायम राहील, असा मला विश्वास आहे," असेही त्यांनी आपल्या भावनिक संदेशात नमूद केले. शेतकऱ्यांच्या संकटात संवेदनशील निर्णय घेत खा. अशोकराव चव्हाण यांनी पुन्हा एकदा सामाजिक जबाबदारीचे उदाहरण ठेवले आहे.

## 'माणुसकी'चा उमेदवार! नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत 'कार्यकर्ता' नाही तर 'सेवेकरी' परेश कार्यांची हवा

### पक्ष-जात बाजूला ठेवून ; त्यांच्या समाजकार्या मुळे जिंकली मने !

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

**घाटंजी** – आजच्या राजकीय वातावरणात जिथे पक्ष आणि जातीच्या नावावर मते मागितली जातात, तिथे एक वेगळाच चेहरा लोकांच्या मनात घर करून आहे – तो म्हणजे परेश कार्या यांचा. अनेक वर्षांपासून कोणत्याही राजकीय अजेंड्याशिवाय केवळ समाजकार्याला वाहून घेतलेल्या परेश कार्यांनी, आता नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात एक नवी आणि आकर्षक चर्चा सुरू केली आहे.

**पक्षापलीकडचा आधारस्तंभ**



काँग्रेस कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख असली तरी, त्यांची खरी ओळख कोणत्याही राजकीय पक्षाच्या नावाने नाही, तर त्यांच्या निस्वार्थ समाजकार्याने आणि त्यांच्या नेहमी उपलब्ध असणाऱ्या कार्यालयामुळे आहे. नागरिकांसाठी परेश कार्या हे एक 'सेवेकरी' आणि संकटमोचक म्हणून ओळखले जातात, 'कार्यकर्ता' म्हणून नाही. त्यांनी राजकारण आणि जातीय भेदभावाला पूर्णपणे बाजूला करून फक्त आणि फक्त मानवतेची सेवा केली आहे.

**संकटकाळातील 'देवदूत' आणि अन्नदानाचा यज्ञ**

कोरोना लॉकडाऊनचा काळ, जेव्हा माणसे एकमेकांना घाबरत होती, तेव्हा परेश कार्या यांनी दाखवलेले धाडस आणि सेवाभावी वृत्ती अतुलनीय आहे. त्यांनी कोणताही विचार न करता, गरजूंसाठी अन्नदानाचा मोठा यज्ञ सुरू केला. जीवावर उदार होऊन त्यांनी गरजू लोकांना 'नदान सेवा' पुरवली आणि त्यांच्या पोटाची भूक भागवली.

याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, या कठीण काळात ज्या बुजुर्ग (ज्येष्ठ) लोकांना त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनीही हात लावायला भीतीपोटी टाळले, त्यांना परेश कार्यांनी मदतीचा आधार दिला. संकटाच्या क्षणी माणुसकी हरवत असताना, परेश कार्यांनी खऱ्या अर्थाने माणुसकीचे दर्शन घडवले.

**नगराध्यक्षपदाची शर्यत: 'माणुसकी' विरुद्ध 'राजकारण'?**

त्यांच्या याच कार्यामुळे, आजच्या हंगामी निवडणुकीत नगराध्यक्ष म्हणून त्यांचे नाव आघाडीवर आहे. लोक आता पक्षाच्या चिन्हापेक्षा माणुसकीच्या कार्याला अधिक महत्त्व देत आहेत.

"मी कोणत्याही पक्षाचा नाही, मी माणुसकीच्या नावाने ओळखला जातो," हेच जणू त्यांचे निवडणुकीचे ब्रीदवाक्य आहे.

परेश कार्या हे केवळ खुर्ची मिळवण्यासाठी नव्हे, तर त्यांच्या 'माणुसकी'च्या कार्याने आणि जनसेवेच्या अनुभवाने लोकांसमोर येत आहेत. त्यामुळे, यंदाच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी ही लढत पक्षाच्या राजकारणाऐवजी, 'सेवेची ताकद' आणि 'माणुसकीचा विचार' घेऊन लढणाऱ्या उमेदवाराची ठरणार आहे.

## धंगेकर यांची भूमिका भाजपविरोधात नाही; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची स्पष्टोक्ती

**दैनिक युवक आधार**
**पुणे**

'शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर यांची भूमिका भाजपविरोधात नाही. ज्या गोष्टीची माहिती मिळाली, त्यावर ते बोलले आहेत. महायुतीत दंगा करायचा नाही, असे धंगेकर यांना सांगितले आहे. जैन बोर्डिंग प्रकरणावर लवकरच पडदा पडेल,' असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

आळंदीतील भक्त निवास आणि महाद्वार ते पुंडलिक मंदिर घाट सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. मंत्री



उदय सामंत, भरत गोगावले, रवींद्र धंगेकर या वेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, 'रवींद्र धंगेकर काम करणारा आणि अन्यायाविरोधात लढणारा कार्यकर्ता आहे. महायुतीत दंगा करायचा नाही, असे मी त्यांना सांगितले आहे. तो विषय आता संपला आहे.

धंगेकर यांना ज्या गोष्टीची माहिती मिळाली, त्यावर ते बोलले.

शेवटी महायुती आहे. विरोधकांच्या हातात कोणतेही कोलीत द्यायचे नाही, असे धंगेकर यांना सांगितले आहे. जे प्रकरण सुरू आहे, त्यावर लवकरच पडदा पडेल आणि हा विषय संपेल.'

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# ॲनिमेशन : कल्पनाशक्ती, तंत्रज्ञान आणि समाजाचा बदलता चेहरा



२८ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मूळ १८९२ सालच्या फ्रान्समध्ये दडलेले आहे, जेव्हा एमिल रेनॉ (Émile Reynaud) यांनी पॅरिसमधील 'म्युझियम ग्रेव्हिन' येथे 'Pantomimes Lumineuses' हा जगातील पहिला ॲनिमेटेड फिल्म शो सादर केला. त्या घटनेने मानवाच्या कल्पनाशक्तीला आणि दृश्य तंत्रज्ञानाला एक नवीन दिशा दिली. त्या स्मरणार्थ युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन संघटनेने (ASIFA) २८ ऑक्टोबर हा दिवस ॲनिमेशनचा जागतिक उत्सव म्हणून मान्यता दिली. आज हा दिवस केवळ कलाविष्काराचा सन्मान नाही, तर मानवी सर्जनशीलता, सामाजिक परिवर्तन, आणि सांस्कृतिक संवादाचे प्रतीक बनला आहे. ॲनिमेशन म्हणजे केवळ बालकांचे मनोरंजन नव्हे; ते एक सांस्कृतिक, शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय माध्यम आहे. चलतचित्रांच्या माध्यमातून कल्पनांना जीवन देणारे हे कला-साहित्य मानवी मनोविज्ञान, सामाजिक मूल्ये आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे एकत्रित रूप आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ॲनिमेशन हे केवळ दृश्य कलारूप नसून, समाजातील विचारप्रवाह, सत्तासंबंध, लिंगभेद, वर्गभेद आणि सांस्कृतिक ओळख यांचे प्रतिबिंब आहे.

ॲनिमेशनचा इतिहास हा मानवाच्या कल्पनाशक्तीच्या प्रगतीचा इतिहास आहे. गुहेतील चित्रांपासून ते डिजिटल ३D आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दृश्यांपर्यंतची ही उत्क्रांती म्हणजे सर्जनशीलतेचा प्रवास आहे. समाजशास्त्रज्ञ मॉरिस हाल्बवाच्स यांनी मांडलेल्या 'सामूहिक स्मृती' (Collective Memory) या संकल्पनेनुसार, प्रत्येक समाज आपल्या इतिहास आणि संस्कृतीचे संरक्षण आठवणींमधून करतो. ॲनिमेशन ही त्या स्मृती जिवंत ठेवण्याची आधुनिक पद्धत आहे. पौराणिक कथा, लोककथा, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक विचार हे सर्व आज ॲनिमेशनच्या माध्यमातून नव्या पिढीकडे पोहोचत आहेत. भारतातील ॲनिमेशनचा प्रवास स्वतंत्र आणि बहुआयामी आहे. १९५६ साली माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या फिल्म विभागाने 'The Banyan Deer' हा पहिला भारतीय ॲनिमेशन चित्रपट प्रदर्शित केला. त्यानंतर राम मोहन, भिमसेन, जी.के. गोखले, कैलाश रेखी यांनी भारतीय ॲनिमेशनला जागतिक ओळख दिली. 'रामायण', 'हनुमान', 'पंचतंत्र कथा', 'छोटा भीम', 'मोटू पतलू', 'शक्तिमान', 'आर्यन' यांसारख्या ॲनिमेशन मालिका भारतीय संस्कृती, नैतिकता आणि सामाजिक विचारांना दृश्यरूप देतात. या कलाकृतींनी ग्रामीण आणि नागरी समाजातील मुलांपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचवण्याचे कार्य केले आहे.

समाजशास्त्रीयदृष्ट्या ॲनिमेशन ही सामाजिकरणाची प्रक्रिया घडविणारे माध्यम आहे. एमिल दुर्खीम यांच्या मते, समाजातील प्रत्येक संस्था सामाजिक ऐक्य वाढवते. ॲनिमेशनमधून मुलां मध्ये नैतिक मूल्ये, सहानुभूती, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव विकसित होते. उदा. 'पंचतंत्र कथा' अथवा 'जातक कथा' यांवर आधारित ॲनिमेशनमधून जीवनमूल्ये अत्यंत सोप्या व रंजक पद्धतीने सांगितली जातात. ॲनिमेशनमधील दृश्य आणि भावनिक सादरीकरणामुळे बालकांच्या मनावर त्या मूल्यांचा दीर्घकालीन प्रभाव पडतो. परंतु ॲनिमेशन केवळ मूल्यसंस्कारच रुजवत नाही; ते समाजातील असमानता, सत्तासंबंध आणि विचारसरणी देखील प्रतिबिंबित करते. अनेक लोकप्रिय ॲनिमेशन चित्रपटांमध्ये पाश्चात्त्य विचारसरणी, पुरुषप्रधानता आणि उपभोगतावादी जीवनशैलीचे दर्शन घडते. पियरे बोर्द्यू (Pierre Bourdieu) यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) या संकल्पनेनुसार, समाजातील कलामाध्यमे ही सत्ता आणि वर्गसंघर्षाशी निगडित असतात. ॲनिमेशनही त्याला अपवाद नाही. डिस्ने, पिक्सार, ड्रीमवर्क्स यांसारख्या कंपन्यांनी जगभरात सांस्कृतिक कल्पना पसरवल्या पण त्या प्रामुख्याने पाश्चात्त्य मूल्यांवर आधारित आहेत. परिणामी, स्थानिक संस्कृती आणि परंपरा हळूहळू बाजूला पडतात.

तथापि, भारतीय ॲनिमेशनने या प्रवाहाला वेगळी दिशा दिली आहे. भारतीय निर्मात्यांनी लोककथांवर, आणि भारतीय नैतिक तत्त्वांवर आधारित कथा मांडल्या. 'छोटा भीम' सारख्या कथांमध्ये भारतीय सामाजिक मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि नैतिकतेचे दर्शन घडते. अशा प्रकारे ॲनिमेशन समाजातील संस्कृतीचा प्रसार आणि सांस्कृतिक ओळख जपण्याचे कार्य करते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ॲनिमेशन हे एक सांस्कृतिक संवादाचे साधन आहे. समाजातील वेगवेगळ्या गटांना एकत्र आणणारे, त्यांच्या कथा आणि भावना मांडणारे हे माध्यम विविधता टिकवून ठेवते. उदा. आदिवासी जीवन, पर्यावरणीय प्रश्न, महिला सक्षमीकरण, आणि सामाजिक न्याय या विषयांवरील ॲनिमेशन चित्रपटांद्वारे सामाजिक जाणीवा अधिक प्रभावीपणे पोहोचतात.

ॲडोर्नो आणि हॉर्कहायमर यांनी 'Culture Industry' ही संकल्पना मांडताना दाखवले की, आधुनिक माध्यमे उपभोगवादी संस्कृती वाढवतात. ॲनिमेशन उद्योग याच प्रवृत्तीचे आधुनिक रूप आहे. लोकप्रिय पात्रांवर आधारित खेळणी, कपडे, खाद्यपदार्थ, आणि मोबाइल गेम्स यांच्या विक्रीमुळे ॲनिमेशन हे भांडवलशाही संस्कृतीचे प्रमुख साधन बनले आहे. या प्रक्रियेत बालकांचे मन उपभोगाच्या संस्कृतीकडे आकर्षित होते. परंतु त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संदेशांसाठी ॲनिमेशनचा उपयोग केल्यास ते परिवर्तनाचे सामर्थ्यवान माध्यम ठरते. सध्या शैक्षणिक ॲनिमेशन ही संकल्पना अत्यंत लोकप्रिय झाली आहे. 'एडूटेनमेंट' (Education + Entertainment) या पद्धतीद्वारे विज्ञान, इतिहास, गणित आणि सामाजिक शास्त्रे यांची समज विद्यार्थ्यांना सोप्या, दृश्यप्रधान आणि रंजक स्वरूपात करून देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे विशेषतः उपयुक्त ठरते. समाजातील ज्ञानाचे लोकशाहीकरण घडविण्याचे कार्य ॲनिमेशन प्रभावीपणे करत आहे. डिजिटल युगात ॲनिमेशनचे रूप अत्यंत व्यापक झाले आहे. ३D, आणि AI यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ॲनिमेशन आता कल्पनेच्या मर्यादा ओलांडून वास्तवाशी मिसळत आहे. YouTube, Netflix, Hotstar, Amazon Prime सारख्या प्लॅटफॉर्म्सनी या कलारूपाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. भारतीय निर्माते जागतिक दर्जाचे ॲनिमेशन तयार करत आहेत आणि 'Make in India' अंतर्गत ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्रात मोठ्या रोजगारनिर्मितीच्या संधी निर्माण होत आहेत. National Skill Development Corporation च्या अहवालानुसार, २०३० पर्यंत या क्षेत्रात सुमारे २० लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात.


तथापि, ॲनिमेशनचा समाजावर होणारा परिणाम सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी पाहिला पाहिजे. हिंसा, लिंगभेद, अति-उपभोग आणि अवास्तव कल्पना दाखवणाऱ्या ॲनिमेशनमुळे बालकांच्या मनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. त्यामुळे माध्यम साक्षरता (Media Literacy) वाढवणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यायोगे प्रेक्षक ॲनिमेशनमधील संदेशांची चिकित्सक दृष्टीने व्याख्या करू शकतील. समाजशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात ॲनिमेशन हे 'आरसा' आहे, जो समाजातील वास्तव दाखवतो, आणि कधी कधी ते वास्तव बदलण्याची प्रेरणाही देतो. सामाजिक असमानता, लिंगभेद, पर्यावरणीय संकट, युद्ध, शांती, आणि मानवतेचे प्रश्न हे सर्व ॲनिमेशनच्या माध्यमातून संवेदनशील आणि प्रभावीपणे मांडता येतात. त्यामुळे ॲनिमेशन ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे.

२८ ऑक्टोबरचा 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' आपल्याला आठवण करून देतो की मानवी कल्पनाशक्ती अमर्याद आहे. ती समाजातील बंधने मोडून नवीन विचार, नवीन संस्कृती आणि नवीन दृष्टिकोन निर्माण करू शकते. ॲनिमेशन ही केवळ कला नाही, ती कल्पनाशक्तीच्या समाजशास्त्राचे दृश्य रूप आहे, जिथे तंत्रज्ञान आणि मानवी भावना एकत्र येतात, आणि जिथे प्रत्येक रंग, प्रत्येक चळवळ, प्रत्येक पात्र समाजाच्या आरशात नवीन प्रतिबिंब निर्माण करते.

आजच्या डिजिटल जगात, जिथे माहिती आणि प्रतिमा सर्वत्र उपलब्ध आहेत, तिथे ॲनिमेशन समाजाला विचार करण्यास, संवेदनशील होण्यास आणि बदल घडविण्यास प्रवृत्त करते. म्हणूनच ॲनिमेशनकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, ते मानवी कल्पनाशक्तीचे सामाजिक माध्यम म्हणून ओळखले पाहिजे. हाच या दिवसाचा खरा संदेश की ॲनिमेशन म्हणजे मानवी विचारांचा, संस्कृतीचा आणि समाजाचा अखंड प्रवास आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# विज्ञानरत्न डॉ जयंत नारळीकर



जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण स्वर्गीय डॉ जयंत नारळीकर यांना यंदाचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानरत्न हा वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. डॉ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर का होईना हा पुरस्कार मिळाल्याने खगोलप्रेमींना कमालीचा आनंद झाला आहे कारण या पुरस्कारावर त्यांचा हक्कच होता. डॉ जयंत नारळीकर यांना हा पुरस्कार त्यांच्या हयातीतच मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता पण असो देर आये दुरुस्त आये असे म्हणत या पुरस्काराचे स्वागत करायला हवे. डॉ जयंत नारळीकर यांचे याच वर्षी २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**

# भीमगर्जना कार्यालय उद्घाटन प्रसंगी, भाई अशांत वानखेडे यांची साखरतुला





**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

ज्येष्ठ सामाजिक नेते भाई अशांत वानखेडे यांच्या वाढदिवसा निमित्त व भीमगर्जना मुख्य कार्यालयाचे उद्घाटनाच्या औचित्य साधून भाई अशांत वानखेडे यांची साखर तुला करण्यात आली.

मलकापूर येथील स्टेशन रोडवरील भीमगर्जनाचे नव्याने सुरू झालेल्या कार्यालयाचे उद्घाटन भाई अशांत वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले असून याच वेळी त्यांच्या वाढदिवसाचे निमित्त साखर तुला करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलाने करण्यात आली भीमगर्जना चे नव्याने सुरू झालेले कार्यालयाचे फीत कापून भाई अशांत वानखेडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्य अतिथी म्हणून भाई अशांत वानखेडे अध्यक्ष समतेचे निळे वादळ, धनश्रीताई काटीकर पाटील हिंदी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र अध्यक्ष, प्रा प्रकाश थाटे राष्ट्रीय अध्यक्ष लाईव्ह, अशोक सुरडकर महाराष्ट्र प्रमुख भीमगर्जना, अजय टप विदर्भ संघटक हिंदी मराठी पत्रकार संघ, दामोदर शर्मा शेतकरी नेते, विजयजी डागा , श्रीकृष्ण तायडे जिल्हाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, सतीश दांडगे विदर्भ सचिव हिंदी मराठी पत्रकार संघ, सुधाकर तायडे तालुका अध्यक्ष, रवी वाकोडे, बळीराम बावस्कार, नथूजि हिवराळे, शेख निसार , मयूर लड्डा, अनिल गोटी, आत्माराम मोरे, प्रा. विजय तायडे, रवी बाभुळकर, मुन्ना रायपुर, दिलीप इंगळे , ऋषिकेश तेजेकर , मंगेश मेढे, रवी दाभाडकर हे उपस्थित होते

# अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून दोन मोबाईल आणि लॅपटॉप नेले चोरून

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :**

अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून दोन मोबाईल आणि लॅपटॉप चोरून नेल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या घडली.

केदार चौधरी हे करंजाडे, सेक्टर २ येथे राहतात. ते दिवाळी पहाट कार्यक्रम पाहायला गेले होते. कार्यक्रम पाहून घरी आल्यावर ते घराचा दरवाजा उघडा ठेवून घरातील साफसफाई करत असताना त्यांनी घरातील टीपॉय वर लॅपटॉप आणि दोन मोबाईल ठेवले होते. दरम्यान, ते साफसफाई करताना किचनमध्ये गेल्याची संधी साधून घरात शिरलेला अज्ञात चोरटा घरातून जाताना त्यांच्या निदर्शनास आला.

त्यावर त्यांनी किचनमधून बाहेर येऊन पाहिले असता टीपॉयवर ठेवलेले दोन मोबाईल व लॅपटॉप जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या चोरट्याने आपले दोन मोबाईल व लॅपटॉप चोरून नेल्याच्या त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात जाऊन या प्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार, पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करून त्याचा शोध सुरू केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते देवेंद्र भुजबळ यांना "माध्यमभूषण" पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते देवेंद्र भुजबळ यांना पनवेल येथे पहिला "गौरव महाराष्ट्राचा: राज्यस्तरीय माध्यमभूषण पुरस्कार " प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की,१९९८ साली मी पहिल्यांदा खासदार झालो,तेव्हा श्री देवेंद्र भुजबळ हे कोकण विभागाचे माहिती उपसंचालक होते. तेव्हापासून मी त्यांचे काम जवळून पाहिले आहे. सतत लोकाभिमुख, कार्यतत्पर ,सर्व माध्यमातील व्यक्तींशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केलेले,त्यांना मदत, मार्गदर्शन करणारे आणि विशेष म्हणजे,निवृत्त झाल्यावरही स्वस्थ न बसता आजही प्रसार माध्यमांमध्ये आजही ते सक्रिय असून त्यांना माध्यमभूषण पुरस्कार देताना आपल्याला आनंद होत आहे.त्यांना हा पुरस्कार दिल्याने या पुरस्काराचीच प्रतिष्ठा वाढली आहे असे सांगून त्यांनी श्री. भुजबळ यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



कोकणातील दि म्हसळा टाइम्स या वृत्तपत्राच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त रुक्मिणी पांडुरंग पोटले चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई,आणि आदर्श शैक्षणिक समूह संचलित, डी.डी. विसपुते अध्यापक विद्यालय व आदर्श टीचर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार निवड समितीचे प्रमुख , जेष्ठ लेखक श्री सुनील चिटणीस यांनी प्रारंभी सर्वांचे स्वागत करून श्री देवेंद्र भुजबळ यांच्या प्रसार माध्यमातील सततच्या उपक्रमशिलतेमुळे तसेच नवोदित पत्रकार, लेखक,कवी यांना सतत प्रेरणा देऊन, मार्गदर्शन करून व्यासपीठ उपलब्ध दिल्याबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड केल्याचे सांगितले.त्यांच्या माध्यमभूषण या पुस्तकाचेच नाव पुरस्कारासाठी समर्पक वाटल्याने तेच नाव या पुरस्काराला दिले आहे असेही ते म्हणाले .दि म्हसळा टाइम्स या वृत्तपत्राच्या दिवाळी अंकाचे प्रकाशनही श्री रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी दि म्हसळा टाइम्स या वृत्तपत्राचे संपादक रमेश पोटले,न्यूज स्टोरी टुडे च्या निर्मात्या अलका भुजबळ, पत्रकार गणेश कोळी, रवींद्र मालुसरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमापूर्वी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना देवेंद्र भुजबळ यांनी, त्यांनी लिहिलेले माध्यमभूषण पुस्तक भेट देऊन, पुस्तकातील व्यक्तिरेखांविषयी सविस्तर माहिती दिली.

पुस्तक चाळल्यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या पुस्तकामुळे मराठी साहित्यविश्वात एका वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकाची भर पडली, असे गौरवोद्गार काढून देवेंद्र भुजबळ यांचे अभिनंदन केले.

# 'मोंथा' चक्रीवादळाची तीव्रता वाढणार पुण्यासह राज्यावर परिणाम काय?

**दैनिक युवक आधार**
**पुणे**

बंगालच्या उपसागरातील कमी दाब क्षेत्राचे चक्रीवादळात रुपांतर होत आहे. या चक्रीवादळाला थायलंडने सुचवलेले मोंथा हे नाव देण्यात आले असून, या चक्रीवादळाच्या प्रभावामुळे पुढील ३८ तासांत पुण्यासह राज्यातील काही जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आहे.

अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर अशा दोन्ही समुद्रात सध्या हवामान प्रणाली सक्रिय आहेत. त्यापैकी बंगालच्या उपसागरातील कमी दाब क्षेत्राची तीव्रता वाढून त्याचे तीव्र चक्रीवादळात रुपांतर



होण्याची शक्यता आहे. मोंथा असे नाव असलेले हे चक्रीवादळ वायव्येकडे सरकून मंगळवारी (२८ ऑक्टोबर) आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर धडकण्याचा अंदाज आहे. या चक्रीवादळाचा परिणाम म्हणून आंध्र प्रदेश, ओडिशा, तेलंगणा, छत्तीसगड या राज्यांना रेड अलर्ट, तर पूर्व विदर्भाला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ अनुपम कश्यपी यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोंथा चक्रीवादळाच्या प्रभावामुळे पुढील ४८ तासांत पुण्यासह राज्यभरात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता आहे. पुणे, मुंबई, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, नागपूर या जिल्ह्यांसाठी इशारा देण्यात आला आहे.

मोंथाचा अर्थ काय?

उत्तर हिंद महासागर प्रदेशातील चक्रीवादळांना नाव देण्याचे काम भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या अखत्यारितील प्रादेशिक विशेष हवामान केंद्राद्वारे केले जाते. हे केंद्र जागतिक हवामान संघटना, आशिया आणि पॅसिफिकसाठी संयुक्त राष्ट्रांचा आर्थिक आणि सामाजिक आयोग यांच्या देखरेखीखाली कार्य करते.

या प्रदेशातील चक्रीवादळांसाठी नावे सुचवणाऱ्या देशांमध्ये बांगलादेश, भारत, मालदीव, म्यानमार, ओमान, पाकिस्तान, श्रीलंका, थायलंड, येमेन, इराण, कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती यांचा समावेश आहे.

प्रत्येक देशाकडून १३ नावे सुचवण्यात येतात. त्यानुसार तयार होणाऱ्या १६९ नावांची यादी तयार होते.

नवीन चक्रीवादळ तयार झाल्यावर हवामान विभागाकडून या यादीतील पुढील नाव त्या चक्रीवादळाला देण्यात येते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# जोरण पाडा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माझी विद्यार्थी मेळावा संपन्न

## माजी विद्यार्थी मेळाव्यात सामाजिक एकतेचा संदेश !

**दैनिक :युवक आधार**
**प्रतिनिधी -कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**



जोरणपाडा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत उत्साहात कार्यक्रम संपन्न झाला माजी विद्यार्थी मेळाव्यात सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला याबाबत सविस्तर दि. 26 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जोरणपाडा येथे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमकार पवार साहेब यांच्या संकल्पनेतून माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला.या मेळाव्यात माजी विद्यार्थी, नोकरदार वर्ग तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी शाळेसाठी मदतीचा हात पुढे करत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविले.

या प्रसंगी कांतीलाल गायकवाड, नामदेव गावित, कोंडाजी गायकवाड, सोमनाथ गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.तसेच नव्याने रुजू झालेले मुख्याध्यापक गावित सर व उपमुख्याध्यापक गवळी सर यांचा पालक व ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर भुसारे, श्रीमती भामा गावित, ग्रामपंचायत कर्मचारी मनोज गांगोडे, पोलीस पाटील मोहन महाले, सुनील गायकवाड, सविता उदार, विजया गवळी, इंदुबाई गवळी, विजय उदार, मोतीराम गांगोडे आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या माध्यमातून शाळा, गाव व माजी विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेची नवी भावना रुजविण्याचा प्रयत्न झाला.

# रायगडात अवकाळी पावसाचा कहर ! प्रशासन सतर्क; शेतकरी, पर्यटक, मच्छीमार हैराण

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

परतीच्या पावसाने दणका दिल्यानंतर आता रायगड जिल्ह्यासह संपूर्ण कोकण किनारपट्टीवर मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. या अवकाळी पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून, प्रशासन सतर्कतेच्या सूचना देण्यात व्यस्त आहे. हवामान विभागाने ३० ऑक्टोबरपर्यंत यलो अलर्ट जारी केला आहे. मात्र पावसाच्या या झडीत शेतकरी, पर्यटक आणि मच्छीमार सर्वच हवालदिल झाले आहेत.अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा ,हवामान खात्याचा इशाराअरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पावसाचा जोर वाढला आहे. शनिवारी संध्याकाळपासूनच काळे ढग जमू लागले होते आणि रविवारी पहाटेपासून मुसळधार सरींनी हजेरी लावली.



हवामान खात्याने रायगडसह संपूर्ण कोकणासाठी यलो अलर्ट जाहीर करून नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे." कापणी ठप्प, भातपिके भिजली ,शेतकऱ्यांचे हाल"अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकतीच भातकापणी सुरू झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी पिके वाळवण्यासाठी शेतात ठेवली होती, मात्र पावसाने ही पिके चक्क पाण्यात भिजली. शेतकरी आता हवामान स्थिर होण्याची वाट पाहत आहेत. "एकीकडे कष्टाचं पीक तयार झालं आणि दुसरीकडे आभाळ फाटून सर्व वाहून गेलं," असा आक्रोश शेतकऱ्यांमधून उमटतो आहे." पर्यटन व्यवसायावर पावसाची गडद छाया"दिवाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रायगडातील समुद्रकिनारे, किल्ले आणि पर्यटनस्थळांवर पर्यटकांची मोठी गर्दी होती. मात्र मुसळधार पावसाने पर्यटकांचा हिरमोड केला आहे. मुरूड-जंजिरा किल्ल्याकडे जाणारी जलवाहतूक बंद झाल्याने अनेकांनी निराश होऊन परतावे लागले. हॉटेल, होमस्टे आणि स्थानिक व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर आता चिंता आणि नाराजीआहे. "जलवाहतूक ठप्प, मासेमारीवर संकट"खराब हवामानामुळे किनाऱ्यांवर तीन नंबरचा इशारतीचा बावटा फडकावण्यात आला आहे. त्यामुळे गेटवे ऑफ इंडिया, मांडवा जलवाहतूक सेवा शनिवारी संध्याकाळपासून बंद करण्यात आली आहे. नियमित प्रवासी आणि पर्यटक दोघांनाही आता रस्त्याने प्रवास करावा लागत आहे.समुद्र खवळलेला असल्याने मच्छीमारांना खोल समुद्रात न जाण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. "हवामान स्थिर होईपर्यंत समुद्रात जाणं म्हणजे संकटाला आमंत्रण," असा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

" प्रशासन जागे झाले , नागरिकांना इशारा"रायगड जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सावध राहण्याचे, समुद्र किनाऱ्यांपासून दूर राहण्याचे आणि गरज नसताना बाहेर पडू नये असे आवाहन केले आहे.रायगडकरांना आता प्रशासनाने तातडीने नुकसानीचा पंचनामा, शेतकऱ्यांना मदतीची घोषणा, आणि जलवाहतुकीसाठी पर्यायी योजना राबविण्याची मागणी होत आहे."पत्रकारीचा आवाज जनतेचा सवाल!दरवर्षी पावसाचा तडाखा बसतो, पण नुकसान भरपाईच्या घोषणा हवेतच का विरतात?हवामानाचा अंदाज असतानाही प्रशासन नेहमी 'आश्चर्यचकित' का होते?शेतकरी, मच्छीमार, पर्यटन व्यवसायिक सगळ्यांचं आयुष्य अवकाळी पावसात भिजतंय. आता प्रशासनाने खरंच जागं व्हायचं का फक्त इशारे देत राहायचं?

# निधन वार्ताहर

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड.**

मुदखेड शहरातील ज्येष्ठ नागरिक अशोकराव बळीराम लोखंडे (सावरगावकर) यांचे दिनांक 26 ऑक्टोबर 2025 रोजी, वयाच्या 88 व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांचा अंत्यविधी दिनांक 27 ऑक्टोबर 2025 रोजी (सोमवार) दुपारी 2 वाजता त्यांच्या राहत्या घरी भीमनगर, मुदखेड येथून निघून बौद्ध स्मशानभूमी, भीमनगर येथे करण्यात येणार आहे.



स्वर्गीय अशोकराव लोखंडे हे मुदखेड शहरातील आदरणीय व प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात. ते बौधचार्य नागोराव लोखंडे यांचे वडील होत. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांच्या मागे मुलगे, सुना, नातवंडे व नातलग असा मोठा आप्त परिवार आहे.त्यांच्या आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली.

# थुंकण्याचे कारण विचारल्याच्या रागातून चौघांची तरुणाला मारहाण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

थुंकण्याचे कारण विचारल्याच्या रागातून २३ वर्षीय तरुणाला चौघांनी धक्काबुक्की करून हेल्मेटने मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विक्रांत ठाकूर हा रिस साव, रसायनी येथे राहतो. विक्रांत त्याचा मित्र अभिनव जाधव याच्यासोबत मोटारसायकलने ओएनजीसी सिग्नल, पनवेल येथे पोहचला होता. यावेळी एका कारमधील व्यक्ती कारमधून बाहेर थुंकला, त्याची धुंकी विक्रांतच्या अंगावर उडाली. त्यावर या दोघांनी दुचाकी बाजूला उभी करुन खाली उतरले असता या कारमधून चार जण उतरले. त्यांना विक्रांत याने अंगावर का धुंकलास, असे विचारले असता त्यांच्यात शाब्दिक वाद झाला व पुढे या वादाचे रुपांतर धक्काबुक्कीत झाले. दरम्यान, या चौघांपैकी एकाने हेल्मेट उचलून विक्रांतला जबरी मारहाण केल्याने तो जखमी झाला. या घटनेनंतर दरम्यान, त्याने मारहाण करणारे चार लोक ज्या कारमधून आले होते. त्या कारचात्त्याने त्याच्या मोबाईलमध्ये फोटो काढला असता त्यांच्यापैकी एकाने विक्रांतच्या दुचाकीची चावी काढून घेतली व फोटो डिलीट कर नाहीतर चावी देणार नाही, असे धमकावत तिथून निघून गेले.

या घटनेनंतर विक्रांत याने पनवेल शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या चौघांवर विरोधात गुन्हा नोंद करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

# जीवना बंदरात समुद्रकिनारी रहस्यमय बोया; ग्रामस्थांमध्ये क्षणभर भीती, पोलिसांनी केली वस्तुस्थिती स्पष्ट

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तालुक्यातील जीवना बंदर परिसरात रविवारी सकाळी समुद्राच्या लाटांबरोबर वाहत आलेला एक मोठा बोया पाहून ग्रामस्थांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. हा बोया समुद्रकिनाऱ्यावर आढळल्याने "कुठून आला?", "काही दुर्घटना घडली का?" अशा चर्चांना उधाण आले होते.

या घटनेची माहिती मिळताच श्रीवर्धन पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासानंतर पोलिस निरीक्षक उमेश पाटील यांनी सांगितले की, बागमंडला-मंडणगड दरम्यान पुलाचे काम सुरू आहे आणि काही दिवसांपूर्वी बाणकोट हद्दीमध्ये एक बार्ज (कामासाठी वापरली जाणारी बोट) बुडाल्याची घटना घडली होती. ती बार्ज वर खेचण्यासाठी या बोयाचा उपयोग करण्यात आला होता.



परंतु, खराब हवामान आणि जोरदार वाऱ्यांमुळे दोर तुटल्याने हा बोया समुद्रात वाहून आला, आणि लाटांच्या प्रवाहात वाहत जीवना बंदर किनाऱ्यावर पोहोचला. चारचाकी वाहनांच्या टायरपासून तयार केलेल्या या बोयाचे मोठे आकारमान पाहून ग्रामस्थांमध्ये सुरुवातीला भीती आणि कुतूहल दोन्ही निर्माण झाले होते.

मेरीटाइम बोर्डाचे कर्मचारी श्री. तांबे यांनी याबाबत श्रीवर्धन पोलिस ठाण्यात अधिकृत माहिती दिली. तपासानंतर वस्तुस्थिती स्पष्ट झाल्यानंतर ग्रामस्थांनी दिलासा व्यक्त केला.

# अलिबाग-वडखळ महामार्गाची जनतेला वेठीस धरणारी कोंडी: जबाबदार कोण? रविवारी पुन्हा एकदा नागरीकांची परीक्षा;

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

प्रशासन, मंत्री आणि यंत्रणांची आश्वासनं पुन्हा हवेतच. रविवारी शहाबाज ते पेझारी चेकपोस्ट पर्यंतअलिबाग-वडखळ महामार्गावर वाहनांच्या किलोमीटरच्या रांगा लागल्या. मुलं, वृद्ध, रुग्ण, सर्वजण उन्हाच्या, पावसाच्या दणक्यात तासनतास अडकून राहिले. ही घटना एकदाचं नव्हे, तर दर सुटीच्या आणि अनेकदा दर आठवड्याला घडणारी आहे, आणि प्रशासन मात्र फक्त वाहतूक पोलिसांची गस्त वाढवण्याची पुरातन घोषणाच करत आले.रुग्णवाहिकाही कोंडीत; जिवावर बेतणारी अराजकताएका अपघाताशी संबंधित साक्षीदार सांगतात की, रुग्णवाहिकाचं वेळेत हॉस्पिटलला पोहोचणं अवघड झालं. मागच्या काही वर्षांत यातून जीवितहानी आणि गंभीर दुखापतीच्या घटना घडल्या



आहेत. रस्त्यांवरील अपुऱ्या डागडुजीमुळे खड्डे वाढतात आणि त्या खड्ड्यांचा फटका सर्वसामान्य वाहनचालकांसह रुग्णवाहिकेलाही बसतो.प्रशासन, मंत्री, ठेकेदार यांनी फक्त घोषणांची धूळफेक!या महामार्गाच्या चार पदरी करणासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेली मोठी घोषणा अद्याप हवेतच विरघळली आहे. प्रत्यक्षात ही योजना पीडब्ल्यूडीच्या फाईलमध्येच अडकली. एनएचएआयने अजून २२ किमी रस्ता फक्त दोन पदरीच ठेऊन त्याची डागडुजी आणि रुंदीकरणाची प्रक्रिया 'सल्लागार नेमण्याच्या' पातळीवर आहे, म्हणजेच प्रत्यक्ष वापरकर्त्यांना अजून कोंडीच झेलावी लागणार. पोलिस आणि व्यवस्थापन यंत्रणा केवळ 'दखल' घेतातरस्त्यावर रस्सी किंवा बॅरिअर टाकून वाहतुक एकेरी करता येईल, अशी मागणी नागरिक वारंवार करतात. मध्ये मध्ये घुसणाऱ्या वाहनांचे कडक नियंत्रण झाल्यास अपघात टाळता येतील असं सर्वदूर सांगितलं जातं. पण पोलिस प्रशासनाचा वचक फक्त खबरदारीपर्यंतच मर्यादित! दरवर्षी लाखो रुपयांचं रुंदीकरण, पुन्हा अखंड खड्डे, पुन्हा डागडुजी हे 'सर्कल' थांबणार कधी?जनतेचा दुःखद सवाल: प्रशासनाचा 'रोड' नेमका कोणत्या फायलमध्ये?मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कालावधीतही ही समस्या सुटलेली नाही; उलट त्यांच्या अभूतपूर्व घोषणाही हवेत विरघळल्या. स्थानिक, पर्यटक, व्यापारी, नागरिक सर्वांचा आता एकच सवाल आहे: प्रत्यक्ष कृती कधी? दरवर्षी कोंडी, दरवर्षी जीवाचा खेळ, पण प्रशासन शांत!?हा महामार्ग रस्त्याचा प्रश्न नाही, हाच जगण्याचा प्रश्न बनला आहे. सामान्य माणसांना वेठीस धरून प्रशासन कधीपर्यंत झोपा काढणार? या संतप्त प्रश्नाचं उत्तर मिळण्यासाठी आता नागरिकांना याच मार्गावर एकजुटीनं आवाज उठवावा लागणार आहे!

# मोबाईल हॅक करून सायबर चोरट्यांने गायब केले तब्बल पावणेआठ लाख रुपये

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :**

अज्ञात सायबर चोरट्यांनी तळोजा येथे राहणाऱ्या तरुणाच्या मोबाईलवर एपीके फाईल पाठवून त्याद्वारे त्याचा मोबाईल हॅक करून त्याच्या खात्यातून तब्बल पावणेआठ लाख रुपये परस्पर काढून घेतल्याचे उघडकीस आले. उरण पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.रणधीर सिंह (३६) हा तळोजा फेज २ मध्ये राहतो. तो बेलापूर येथील एका खाजगी कंपनीत नोकरीला आहे. सायबर चोरट्यांनी रणधीर सिंह याच्या मोबाईलवर वाहन चलान बाकी असल्याबाबतचा मेसेज आला. त्यानंतर त्यांना व्हॉट्सॲपद्वारे एक एपीके फाईल पाठवण्यात आली. रणधीर याच्या मोबाईलमध्ये डाऊनलोड झाली. सुरुवातीला रणधीर याने त्याकडे दुर्लक्ष केले; परंतु काही वेळातच त्याला आधार ओटीपी, तसेच बँक खात्याशी संबंधित संदेश येऊ लागले. त्यानंतर त्याच्या खात्यातून सलग चार ट्राझक्शनद्वारे तब्बल हा ७ लाख ८५ हजारांची रक्कम परस्पर काढून घेण्यात आली. या त्यानंतर रणधीर सिंह याने तत्काळ सायबर पोलिसांकडे धाव घेतली. प्राथमिक तपासात सायबर चोरट्यांनी कॉल फॉरवर्डिंग आणि रिमोट ॲक्सेसद्वारे त्याच्या मोबाईलवर ताबा मिळवून त्याच्या खात्यातील पावणे आठ लाखांची रक्कम काढून घेतल्याचे आढळून आले.

त्यानंतर रणधीर सिंह याने उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज जासई चे सुयश

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद, रायगड द्वारा कराटे डो ऑर्गनायझेशन ऑफ रायगड, यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा २०२५ - २६ वयोगट १४, १७ ,१९ वर्षाखालील मुला मुलींची कराटे स्पर्धा दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुलन नेहुली अलिबाग येथे घेण्यात आली. या स्पर्धेत जासई हायस्कूलचा १२ वी चा विद्यार्थी पृथ्वीराज कुंभार हा सतरा वर्ष वयोगटामध्ये प्रथम क्रमांकाने यशस्वी झाला. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे व त्याला मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे व समीर पाटील




सरांचे विद्यालयाच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम ,शाळेचे उपमुख्याध्यापक श्री कुटे सर, शाळेच्या पर्यवेक्षिका सौ मुकादमन मॅडम सर्व शिक्षक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांकडून पृथ्वीराज कुंभार व त्याला मार्गदर्शन करणारे समीर पाटील सर व सर्व शिक्षकांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन.

# 'दिबां'च्या नावासाठी पाठपुरावा सुरूच ठेवणार

## विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचा बैठकीत निर्धार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची बैठक रविवारी वाशी येथील नवी मुंबई स्पोर्ट्स क्लबमध्ये झाली. या वेळी 'दिबां'च्या नावासाठी पाठपुरावा सुरूच ठेवण्याचे सर्वानुमते ठरले. या संदर्भात कृती समितीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.

या बैठकीस कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार जगन्नाथ पाटील, जे.एम. म्हात्रे, सरचिटणीस दीपक म्हात्रे, सहचिटणीस संतोष केणे, राजेश गायकर, खजिनदार जे.डी. तांडेल, सदस्य 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, दशरथ भगत, रूपेश धुमाळ, ॲड. भारद्वाज चौधरी, सुरेश पाटील, राजाराम पाटील, विजय गायकर यांच्यासह इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे यासाठी राज्य सरकारने ठराव मंजूर करून केंद्र सरकारला पाठवलेला आहे. याबाबत केंद्रातील मोदी सरकारही अनुकूल असल्याचे काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले होते. याच अनुषंगाने पुढे पाठपुरावा करण्याचे वाशी येथील बैठकीत ठरले.

# चोरीच्या उद्देशाने महिलेची हत्या

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

चोरीच्या उद्देशाने महिलेची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ येथे उघडकीस आला. संगीता नामदेव म्हात्रे असे हत्या झालेल्या महिलेचे नाव असून पनवेल शहर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला.

24 ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास संगीता नामदेव म्हात्रे (वय 55) ह्या त्यांच्या रूम मध्ये असताना अज्ञात इसमाने चोरी करण्याच्या उद्देशाने संगीता म्हात्रे यांचा गळा दाबून त्यांची हत्या केली. आणि त्यांच्याकडील दहा ग्राम वजनाची सोन्याची चैन, नऊ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याच्या अंगठ्या आणि कानातील सोन्याच्या साखळ्या असा मुद्देमाल चोरून नेला. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यावेळी फॉरेन्सिक व्हॅन, फिंगरप्रिंट आणि श्वान पथक यांनी घटनास्थळी भेट दिली आहे. आरोपी विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २५ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# अभिनेते विजय पाटकर यांच्या हस्ते व्ही. एन. इलेक्ट्रॉनिक्स आयोजित 'जितो धन धना धन ऑफर'ची भव्य सोडत

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**

कळंबोली शहरातील सुप्रसिद्ध व्ही. एन. इलेक्ट्रॉनिक्स यांच्या वतीने दिवाळीच्या शुभ प्रसंगी 'जितो धन धना धन ऑफर' या विशेष ऑफरचे आयोजन करण्यात आले होते. ग्राहकांनी खरेदी केल्यानंतर मिळालेल्या लकी कूपनच्या आधारे या ऑफरची सोडत करण्यात आली. या सोडतीचा कार्यक्रम हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम अभिनेते विजय पाटकर यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमाला व्ही. एन. इलेक्ट्रॉनिक्सचे संस्थापक विजय कक्कड, मोहित कक्कड, तसेच संपूर्ण कक्कड परिवार, कर्मचारीवर्ग आणि ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संपूर्ण कळंबोली परिसरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.







या सोडतीत पहिले पारितोषिक म्हणून हिरो मोटरसायकल देण्यात आली, तर ५५ इंची एलईडी टीव्ही, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन आणि वॉटर प्युरिफायर ही आकर्षक बक्षिसे भाग्यवान विजेत्यांनी जिंकली. त्याचप्रमाणे पाच विजेत्यांना २.१ होम थिएटर आणि दहा उत्तेजनार्थ बक्षिसे देऊन कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

या प्रसंगी उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांनी ऑनलाईन फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण केली. कार्यक्रमाच्या शेवटी अभिनेते विजय पाटकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की,

"व्ही. एन. इलेक्ट्रॉनिक्स हा केवळ एक ब्रँड नाही, तर ग्राहकांच्या विश्वासाचा पाया आहे. येथील कर्मचारी आणि व्यवस्थापन हे प्रामाणिकपणे काम करत असून, भविष्यात हा ब्रँड आणखी उंची गाठेल, याचा मला विश्वास आहे."

## पुष्कर जोगच्या आगामी चित्रपटात कलाकारांची मांदियाळी, सिनेमाचं नावही आहे खूपच हटके

पुष्कर जोगच्या आगामी हिंदी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. त्याचबरोबर या चित्रपटातील कलाकारांचे लूक पोस्टरही रिलीज करण्यात आले आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखदेखील निर्मात्यांनी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे पुष्कर जोगच्या चित्रपटाचं नाव फारच वेगळं आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीत क्वचितच पाहिलेलं, वास्तव आणि कल्पनेच्या सीमारेषा मिटवणारं जग आता पडद्यावर येणार आहे. 'ह्युमन कोकेन' हा एक सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपट लवकरच रिलीज होणार आहे. हा सिनेमा प्रेक्षकांना मानवी तस्करी, सायबर सिंडिकेट आणि ड्रग कार्टेलच्या जगात घेऊन जाणार आहे.

या चित्रपटाच्या निमित्ताने पुष्कर जोग पुन्हा एकदा एका प्रभावी आणि आव्हानात्मक भूमिकेत झळकणार आहे. 'जबरदस्त' या मराठी चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण करणारा आणि 'बिग बॉस' मराठीच्या पहिल्या सिझनमधील लोकप्रिय रनर-अप म्हणून ओळख मिळवल्यानंतर, तसेच 'व्हिक्टोरिया – एक रहस्य'च्या यशानंतर, पुष्कर आता पूर्णपणे वेगळ्या आणि संवेदनशील विषयावर आधारित सिनेमात झळकणार आहे.

या चित्रपटाबद्दल पुष्कर म्हणाला, ""ह्युमन कोकेन' हा माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण आणि



भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक चित्रपट आहे. या पात्रात शिरण्यासाठी मी मानसिक आणि शारीरिक तयारीसोबत बऱ्याच कार्यशाळा केल्या. एका गुन्हेगारी जाळ्यात अडकलेल्या व्यक्तीचा अंतर्गत संघर्ष समजून घेणं अजिबात सोपं नव्हतं."

चित्रपटात इशिता राज, सिद्धांत कपूर, जाकीर हुसेन आणि काही ब्रिटिश कलाकारांची तगडी स्टारकास्ट असून चित्रपटाला एक आंतरराष्ट्रीय लुक प्राप्त झाला आहे.

सरीम मोमिन लिखित, दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती स्कार्लेट स्लेट स्टुडिओज, वाइनलाइट लिमिटेड, आणि टेक्स्टस्टेप सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी गूजबंप्स एंटरटेनमेंटच्या सहकार्याने केली आहे. ची तेंग जू आणि हरीत देसाई 'ह्युमन कोकेन' चे निर्माते असून छायाचित्रण सोपन पुरंदरे, संपादन संदीप फ्रान्सिस, संगीत क्षितिज तारे, तर नृत्यदिग्दर्शन पवन शेट्टी आणि खालिद शेख यांनी केले आहे.

# मुंबई पुणे मुंबई'च्या चौथ्या भागाची घोषणा!

लोकप्रिय मराठी चित्रपटाचा चौथा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात प्रेक्षकांची लाडकी जोडी स्वप्नील जोशी व मुक्ता बर्वे पुन्हा एकदा परतणार आहे.

'मुंबई पुणे मुंबई' या गाजलेल्या मराठी चित्रपटाच्या पुढच्या भागाची घोषणा करण्यात आली आहे.

सोशल मीडियावर मुंबई पुणे मुंबई ४ च्या घोषणेचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. यामध्ये चौथ्या भागाबद्दल माहिती देण्यात आली आहे.

**१५ वर्षांपूर्वी सुरू झाला एक रोमँटिक प्रवास...**

मुंबई पुणे मुंबई
मुंबई पुणे मुंबई २
मुंबई पुणे मुंबई ३
ती सध्या काय करते, प्रेमाची गोष्ट,




ऑटोग्राफ, मुंबई पुणे मुंबईचा दिग्दर्शक परत घेऊन येतोय, तुमची आवडती सुपरहिट जोडी. नात्यांचा गोडवा वाढवायला, स्वप्नील जोशी, मुक्ता बर्वे.

सतिश राजवाडे दिग्दर्शित मुंबई पुणे मुंबई ४ या चित्रपटाची निर्मिती संजय छाब्रिया व अमित भानुशाली करणार आहेत. मराठीतील पहिला फ्रेंचायजी चित्रपट ज्याचा चौथा भाग येतोय, असं कॅप्शन या व्हिडीओला देण्यात आलं आहे.

**आधीचे तीन चित्रपट व कथा**

**१. मुंबई पुणे मुंबई (२०१०)**

दिग्दर्शक: सतीश राजवाडे

मुख्य कलाकार: स्वप्नील जोशी (गौतम), मुक्ता बर्वे (गौरी)

**२. मुंबई पुणे मुंबई २ (२०१५)**

दिग्दर्शक: सतीश राजवाडे

मुख्य कलाकार: स्वप्नील जोशी, मुक्ता बर्वे

**३. मुंबई पुणे मुंबई ३ (२०१८)**

दिग्दर्शक: सतीश राजवाडे

मुख्य कलाकार: स्वप्नील जोशी, मुक्ता बर्वे

कथा : गौरी आणि गौतम आता लग्नानंतर आई-बाबा होणार असतात. गर्भावस्थेतील भावनिक प्रवास, छोट्या गोष्टींमधील आनंद आणि जबाबदारीचा गोड गोंधळ दाखवला आला होता. आता चौथ्या भागात गौरी व गौतम यांच्या नात्याचा प्रवास पुढे सरकताना पाहायला मिळेल.

## निवेदिता सराफ यांना यंदाचा गंधार गौरव पुरस्कार जाहीर; उषा नाडकर्णी यांनी पत्रकार परिषदेत केली घोषणा

हिंदी, मराठी चित्रपट आणि मालिका सृष्टीतील चतुरस्त्र अभिनेत्री निवेदिता जोशी सराफ यांना यंदाचा गंधार गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा बाल दिनाच्या औचित्य साधून १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वा. गडकरी रंगायतन येथे आयोजित करण्यात असून निवेदिता यांना हा पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री अशोक सराफ यांच्या हस्ते देण्यात येणार आहे अशी माहिती ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रदीप ढवळ यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

या पुरस्काराचे स्वरूप शाल श्रीफळ सन्मानचिन्ह ११, १११ रुपये रोख असे आहे. तसेच, दोन वर्षांपूर्वी पासून गंधार




बालकलाकार पुरस्कार सुरू केला असून यंदाचा पुरस्कार हा यंदा गायन क्षेत्रातील स्वरा जोशी हिला देण्यात येणार आहे.

गंधार या बालनाट्य संस्थेच्यावतीने गंधार गौरव सोहळ्याचे दरवर्षी आयोजन केले जाते. यंदाचे हे दहावे वर्षे आहे. ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी, विद्या पटवर्धन, दिलीप प्रभावळकर, अशोक समेळ, नरेंद्र आंगणे, अतुल परचुरे, सचिन पिळगावकर, गेल्यावर्षी महेश कोठारे तर विजय गोखले यांना आतापर्यंत गंधार गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यंदाचा हा पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री निवेदिता सराफ यांना देण्यात येत आहे. पद्मश्री अशोक सराफ, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रदीप ढवळ, आमदार संजय केळकर व इतर यांच्या हस्ते निवेदिता सराफ यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. यावेळी बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के - सामंत देखील उपस्थित राहणार आहेत. मे महिन्यात गंधारतर्फे विविध जिल्ह्यांत गंधार गौरव बालनाट्य स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेसाठी ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पुणे येथून प्रवेश आले होते. या स्पर्धेसाठी हर्षदा बोरकर आणि अमोघ चंदन यांनी परीक्षण केले होते. १५ बालनाट्यांनी यात प्रवेश घेतला होता. या स्पर्धेतील नामांकने देखील आज जाहीर करण्यात आली. या पत्रकार परिषदेला गंधारचे प्रा. मंदार टिल्लू, सुनील जोशी, अमोल आपटे, वैभव पटवर्धन, पी. एन. पाटील आदी उपस्थित होते.

**यंदाच्या युवा पुरस्काराचे मानकरी**

१ श्रेयस थोरात
२ शिवानी रांगोळे
३. शिवराज वायचळ

बालनाट्य संस्था पुरस्कार यावर्षी संक्रमण, पुणे (संस्था प्रमुख यतीन माझिरे) या संस्थेला देण्यात येणार आहे. दरवर्षी एकांकिका आयोजन करणाऱ्या आयोजन समितीला देखील पुरस्कार दिला जाणार आहे यामध्ये आणि इंडियन नॅशनल थिएटर आर्ट म्हणजेच आय एन टीला पुरस्कार देण्यात येणार आहे.

## "दीड वर्षांत सिनेमा बंद होणार", दिग्दर्शक महेश मांजरेकरांचं भाकीत!



आजकाल जवळपास सर्वच क्षेत्रांत 'आर्टिफिशियल इंटिलिजन्स' अर्थात AI वापरलं जात आहे. हे तंत्रज्ञान हळूहळू लोकांना त्यांची विविध कामं पूर्ण करण्यास मदत करत आहे. कंटेंट तयार करणं असो, नवीन गोष्टी शिकणं असो किंवा एखादा फोटो तयार करणं असो... ही सगळी कामं 'AI'च्या मदतीने अगदी काही मिनिटांत केली जात आहेत. जवळपास सर्वच क्षेत्रात या AIचं शिरकाव झाला आहे.

AI मुळे येत्या काळात माणसांच्या नोकऱ्यांवरही गदा येणार असल्याच्या चर्चा अधूनमधून होत असतात. आयटी क्षेत्र असो वा मनोरंजन क्षेत्र असो. AI च्या मदतीनं सगळी कामं सोपी झाली आहेत. त्यामुळे या AI चा जितका फायदा आहे, तितकाच संभाव्य धोकासुद्धा आहे, असं मतही काहींनी व्यक्त केलं आहे. या AIचा वापर आता सिनेमाच्या निर्मितीमध्येसुद्धा होतो आहे आणि त्याचमुळे येत्या दीड वर्षात सिनेमा बंद होणार असल्याचं मत दिग्दर्शक, निर्माते व अभिनेते महेश मांजरेकर यांनी व्यक्त केलं आहे.

गेली दोन दशकं महेश मांजरेकरांनी मराठीसह हिंदीत सिनेमा निर्माण करीत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. विविध विषयांवरचे सिनेमे घेऊन ते प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. अशातच नुकत्याच एका मुलाखतीत येत्या दीड वर्षात सिनेमा बंद होणार असल्याचं भाकीत त्यांनी केलं आहे, 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या आगामी सिनेमाच्या निमित्ताने त्यांनी एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत हे भाकीत केलं.

महेश मांजरेकर म्हणाले, "माझं मत आहे की, दीड वर्षात सिनेमा बंद होईल. बंद म्हणजे बंद. AI आता सगळ्यावर भारी पडत आहे. AI ने बनवलेल्या सिनेमाचे ट्रेलर जर तुम्ही पाहिलेत, तर त्यातील व्हिज्युअल्स तुम्हाला कॅमेऱ्याच्या माध्यमातून दाखवणं शक्यच नाही. तुम्ही कितीही चांगले व्हीएफएक्स केलेत तरी त्या सिनेमांसारखे व्हिज्युअल्स दाखवणं शक्यच नाही. मी या AI नं आज घर बसल्या बसल्या 'टायटॅनिक' सिनेमामधील लायटिंग, एखादा चांगला हीरो आणि तांत्रिकदृष्ट्या उत्तम असा सिनेमा करू शकतो."

त्यानंतर ते सांगतात, "मी 'महाभारत'चा ट्रेलर पहिला. अक्षरश: डोळे दीपवणारा ट्रेलर आहे. जर हे सगळं एका क्लिकवर होणार असेल, तर लोक कलाकारांसाठी का पैसे खर्च करतील. अर्थात, AI वापरण्यासाठीसुद्धा हुशारी लागेलच. मी सहा महिन्यांपूर्वी पाहिलेला AI आणि आताचं AI यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. ज्या दिवशी त्यांच्या हाती सिनेमा बनवण्याचा कोड लागेल. त्या दिवशी आपण संपणार. रोज १० हजार सिनेमे बनतील आणि याला काही खर्चही येत नाही."

पुढे महेश मांजरेकर म्हणाले, "माझ्या एका मित्राने AI च्या मदतीने ॲड फिल्म केली आणि त्याला खर्च आला फक्त दोन हजार रुपये. त्यामुळे अनेक लोक AI वर सिनेमे बनवणार; पण ते बघणार कोण? त्यामुळे येत्या दीड वर्षात सिनेमे बंद होणार. हे खूपच धोकादायक आहे.

## भारताचे एडिसन' असणाऱ्या जी.डी.नायडू यांच्यावर येतोय बायोपिक; 'हा' अभिनेता प्रमुख भूमिकेत

भारताचे एडिसन अशी ओळख असणारे प्रसिद्ध संशोधक आणि उद्योजक जी. डी. नायडू (G. D. Naidu) यांच्या जीवनावर आधारित एक सिनेमा येणार आहे. या आगामी सिनेमाच्या घोषणेचा टीझर समोर आला आहे. विशेष म्हणजे भारतीय सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता या सिनेमात नायडूंची भूमिका साकारणार आहे. या अभिनेत्याचं जबरदस्त ट्रान्सफॉर्मेशन बघून प्रेक्षक थक्क झाले आहेत. कोण आहे हा अभिनेता?

दमदार अभिनयासाठी ओळखण्यात आलेला अभिनेता आर.माधवन या सिनेमात प्रमुख भूमिका साकारणार आहेय. या



भूमिकेनुसार माधवनने केलेलं अविश्वसनीय ट्रान्सफॉर्मेशन बघून त्याचे चाहते थक्क झाले आहेत. 'रॉकेट्री: द नंबी इफेक्ट' या सिनेमानंतर माधवन आता पुन्हा एकदा 'जीडीएन' (GDN) या बायोपिकमध्ये एका वेगळ्याच रूपात दिसणार आहे. 'भारताचे एडिसन' म्हणून जी. डी. नायडूंना ओळख मिळाली. नायडूंच्या व्यक्तिमत्वातील अज्ञात पैलू या सिनेमातून उलगडण्यात येणार आहेत.

**माधवनचा अप्रतिम फर्स्ट लुक**

या आगामी सिनेमाचा फर्स्ट लुक टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या टीझरमध्ये माधवनचा ट्रान्सफॉर्मेशन इतका प्रभावी आहे की, हाच माधवन आहे, हे ओळखणंही कठीण आहे. आर. माधवनने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर हा टीझर शेअर करताना लिहिलं, "जी. डी. नायडू यांची ऊर्जा आता सर्वांसमोर आली आहे. ही कथा आहे एका अद्वितीय दृष्टिकोन, महत्त्वाकांक्षा आणि जिद्दीची. 'जीडीएन'चा फर्स्ट लुक टीझर सादर करताना आम्हाला अभिमान वाटतो."

माधवनचा हा नवीन लुक पाहून चाहते थक्क झाले आहेत. अनेकांनी सोशल मीडियावर त्याचं कौतुक केले आहे. एका युजरने 'कमाल आहात तुम्ही मॅडी' अशी प्रतिक्रिया दिली, तर दुसऱ्याने, 'तुम्ही प्रत्येक वेळी आमच्या अपेक्षा उंचावता. आणखी एका दमदार कामाची प्रतीक्षा आहे,' असं लिहिलं. 'प्रत्येक नवीन चित्रपटात तुम्हाला ओळखणं कठीण होतं' अशा शब्दांत चाहत्यांनी माधवनच्या भूमिकेची प्रशंसा केली. या सिनेमात आर. माधवन सोबत प्रियामणी, जयराम आणि योगी बाबू यांसारखे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.'जीडीएन' हा चित्रपट पुढील वर्षी २०२६ ला प्रदर्शित होणार आहे.

**मेष** – हाती घेतलेले काम पूर्णत्वास जाईल. नम्रपणे तुमची भूमिका मांडाल. एखादी अडचण निर्माण होईल. बोलताना नेहमी भान राखावे.

**वृषभ** – ठरवलेले काम पूर्ण कराल. नवीन ओळख उपयुक्त ठरेल. क्षुल्लक गोष्टींनी नाराज होऊ नका. योग्य संधीसाठी वेळ द्यावा लागेल.




**मिथुन** – भावनेच्या आहारी न जाता व्यावहारिक निर्णय घ्याल. आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती कराल. चारचौघांत कौतुकास पात्र व्हाल.

**कर्क** – तुमचे महत्त्व वाढेल. आपणास मान-सन्मान मिळेल. कला-क्रीडा स्पर्धेत यशस्वी व्हाल. आपल्यामुळे इतरांची गैरसोय टाळावी.

**सिंह** – तुमच्या कार्याला योग्य गती मिळेल. अतिअपेक्षा बाळगू नका. मानसिक समतोल साधावा. कोणतेही साहस करताना सतर्क राहावे.

**कन्या** – वैवाहिक जीवन आनंदी असेल. व्यवसायात प्रगती करता येईल. हट्टीपणाचा कळस करू नका. कधीही दुसऱ्याला कमी लेखू नका.

**तूळ** – जोडीदाराच्या सल्ल्याने कृती कराल. आपला बौद्धिक कस लागू शकतो. जवळच्या प्रवासाचा योग येईल. कामाचा व्याप वाढू शकतो.

**वृश्चिक** – जुनी रखडलेली कामे पूर्ण होतील. मेहनतीचे चीज होईल. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. आळस करू नका. आहारावर नियंत्रण ठेवा.

**धनु** – गुंतवणुकीसाठी मार्ग सापडेल. आवडीनिवडीबाबत आग्रही राहाल. ओळखी होतील. वरिष्ठांच्या सल्ल्याशिवाय पुढे जाऊ नका.

**मकर** – घरासाठी खरेदी कराल. जोडीदाराचा सल्ला विचारात घ्यावा. गैरसमजुती मनातून काढाव्यात. खर्चाचा ताळमेळ बसवावा लागेल.

**कुंभ** – उत्तम वैचारिक भूमिका घ्याल. आशावादी दृष्टिकोन कायम ठेवाल. नवीन शिकण्याची संधी सोडू नका. आपले मन अस्थिर होईल.


**मीन** – कला-क्रीडा-साहित्यात मोठे यश मिळेल. नव्या ओळखीच्या सहवासाने उत्साह वाढेल. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

## छठ पूजा म्हणजे नेमकं काय?, जाणून घ्या....

दिवाळी झाल्यानंतर देशातील काही भागांमध्ये तयारी सुरू होते ती, छठ पूजेची. विशेष करून भारताच्या उत्तर भागात छठ पूजेचा सण मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

दरवर्षी भाविक मोठ्या उत्साहात हा सण साजरा करतात. यावर्षी छठ पूजेची सुरूवात २५ ऑक्टोबरपासून झाली आहे. ही पूजा चार दिवस असते.

यामध्ये उपवास, स्नान आणि जल अर्पण यांसारखे विधी पार पडतात. आपण अनेकदा या पूजेबद्दल ऐकले असेल, मात्र ही पूजा नक्की काय असते? नक्की या पूजेत करतात काय? कोणत्या देवाला ही पूजा समर्पित आहे?



जाणून घेऊयात सविस्तरपणे,

**छठ पूजा** –

चार दिवस करण्यात येण्याऱ्या या पूजेला बिहारमधून सुरुवात झाली. पण, आता बिहारसोबत भारतातील इतर भागात जसे की, बिहार, झारखंड, पूर्व उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि नेपाळ येथेही हा उत्सव साजरा केला जातो.

ही पूजा सूर्यदेव आणि षष्ठी मैया यांना समर्पित आहे. हा सण मुलांसाठी करण्यात येतो. हे ३६ तासांचे व्रत असते. हिंदू पौराणिक कथेनुसार, सूर्यदेव आरोग्याशी संबंधित समस्या दूर करतो आणि सुख-समृद्धी देतो. त्यामुळे आरोग्य आणि समृद्धीसाठी हे व्रत पाळले जाते.

**कसा साजरा होतो सण ?**

छठ पूजेचा सण चार दिवसांचा असते. भाऊबीजेच्या तिसऱ्या दिवसापासून याची सुरुवात होते. पहिल्या दिवशी खडे मीठ, तूप घालून केलेला अरवा भात आणि भोपळ्याची भाजी प्रसाद म्हणून दिली जाते. दुसऱ्या दिवशी उपवास सुरू होतो. उपवास करणारे दिवसभर अन्न-पाणी सोडून देतात, संध्याकाळी खीर तयार केली जाते. पूजा झाल्यावर प्रसाद देतात, ज्याला खरना असेत म्हणतात. तिसऱ्या दिवशी मावळत्या सूर्याला अर्घ्य दिला जातो. शेवटच्या दिवशी उगवत्या सूर्याला नैवेद्या दाखवला जाते. या चार दिवसात पवित्रतेची खूप जास्त काळजी घेतली जाते.

# अरबी समुद्रात वादळसदृश्य परिस्थिती हवामान खात्याचा इशारा !

## नायगाव,ता.वसई येथील वेलंकणी आई नावाची नौका बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

अरबी समुद्रात पून्हा एकदा कमी दाबाचापट्टा निर्माण झाला असल्याने कोकणासह कोल्हापूर सांगलीआणि म्हराष्ट्रांतील विविध भागात पाऊस पडण्याची श्यक्यता खात्याने वर्तविली आहे दोनदिवसा पासून अरबी समुद्रात वादळसदृश्य परिस्थितीनिर्माण झाली असल्याने मच्छीमारांनी खबरदारी घेऊन आपल्या नौका मासेमारी करता समुद्रात 28 ऑक्टोबर पर्यंत घेऊन जाऊनये असा इशारा हवामान खात्याने दिला असल्याने मासेमारीनौका आश्रयासाठी जवळील बंदरात दाखल झाल्या आहेत.यामध्ये गुजरात राज्यांतील मासेमारी नौकांचासमावेश मोठया प्रमाणात आहे,. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार 28 ऑक्टोबर पर्यंतसमुद्रात तशी 40 ते 50 किलोमीटर्स वेगाने वारे वाहण्याची श्यक्यता आहे. समुद्रातील वातावरण अत्यंत खराब व धोकादायक असल्याने मासेमारी बंद करण्याचा निर्णय मच्छीमारबांधवानी घेतला असून आपल्या मासेमारी नौका बंदरात नांगरून ठेवल्या आहेत,

हवामान खात्याचा वादळाचा इशारा असतानाही काहीजण हव्यासापोटी आशा वादळीवाऱ्याही आपला जीव धोक्यातघालून भर समुद्रात आपल्या मासेमारीनौका हाकारून मासेमारी करण्या साठी जातात परिणामीकालच्या वादळात मध्ये खोचीवडे-नायगाव,ता.वसई जिल्हा पालघर येथील देवराम कान्हा वैती यांच्या मालकीची वेलंकणी आई नावाची(नौकेचा नंबर IND-MH-2-MM-1473) मासेमारी करण्या साठी गेलेली ही नौका बुडाल्याचे समजते सदरच्या नौके वरील खलाशी बेपत्ता असूनसदर शोधकार्य युद्ध पातळीवर सुरुअसल्याचे समजते.



# करंजा गावातील नागरिकांची अवस्था “नाच करे बंदर मालखाये मदारी” ?

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

करंजा ते रेवस या सागरी सेतु च्या कामाला ऑक्टोबर 2024 मध्ये सुरवात झाली. या पुलाचं काम ॲफकॉन कंपनीकडून करण्यात येत आहे. सदर सागरीसेतू मुळे शेतकरीवर्ग, मच्छिमार आणि आदिवासी हेबधीत झाले असून या समाजाला महाराष्ट्र शासनाच्या 2023 च्या GR नुसार आजपर्यंत नुकसान भरपाईदेणे आवश्यक असतानाही तीआज पर्यंत देण्यात आलेली नाही. वेळोवेळी शासन दरबारी पाठपुरावा करून सुद्धा आश्वासनांच्या पलीकडे काहीच हाती लागलेलं नसल्याने प्रकल्पामुळे बधीत झालेल्या स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळलेली आहे.

काही महिन्यापूर्वी स्थानिक आमदार आणि राज्याच्या मच्छिमार आणि बंदरे विकास मंत्र्यांकडून नुकसान भरपाई देण्याची घोषणा करंजा गावात झालेल्या सभेत करून सुद्धा पोकळ आश्वासना पलिकडे बधीतांच्या हाती काहीचं लागलेलं नाही. याउपर या प्रकल्पात स्थानीय शेतकरीवर्ग आणि मच्छिमार समाजावर पोलीस विभागाला हाताशी धरून अन्याय करण्यात येत असल्याचे या समाजाचे म्हणणे.आहे.



शिवाय या प्रकल्पात स्थानीकांना डावलून गावाच्या बाहेरील आणि परप्रांतीय लोकांचा या कामात दिवसेंदिवस हस्तक्षेप वाढत आहे.

भरीसभर म्हणून करंजा ते उरण या रस्त्याचं काम मार्च 2025 रोजी करण्यात आलं या करिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चार कोटींचा खर्च करण्यात आला मात्र रेवस ते करंजा पुलाच्या कामा करीता लागणारे बोल्डर्स, गर्डर , काँक्रीट चे बल्कर डंपर ट्रांकर्स ट्रेलर अशा अवजड वहातूकीमुळे या मार्गावर रस्त्यावर वारंवार खड्डे पडून रस्त्या खचला आहे.याच मार्गावर करंजा मच्छिमार बंदरात येणाऱ्या मच्छिवहातूक करणाऱ्या कंटेनर,टेम्पो पाण्याचे ट्रॅकर बर्फ च्या गाड्यांमुळे वहातूक कोंडीचा त्रास स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे.

परंतु राजकीय आणि शासकीय यंत्रणेचे कंपनीबरोबर अर्थ पूर्ण संबध आल्यामुळेच तेरी भी चुप मेरी भी चुप अशी अवस्था निर्माण झाली आहे या विरोधात आवाज उठविण्यात आल्यास पोलीसदल सेवेत तत्पर राहून त्यांचं काम ते ईनामें इतबारे करत आहेत. या प्रश्नावर विरोधकांना या कामात कंपनीकडून खारीचा वाटा मिळाल्यामुळे त्यांची तोंडेही बंद आहेत . सध्या करंजा गावातीलसेतूबधीत नागरिकांची अवस्था “नाच करे बंदर माल खाये मदारी” अशी झाली आहे.दरम्यान रायगडचे खासदार सुनील तटकरे साहेबांनीया विषयावर सुतोवाच्य केले की मला करंजा ग्रामस्थ भेटले त्यांच्याकाही हरकती काही व्यथा होत्या त्यामी जाणून घेतल्या रेवस-करंजा सागरीसेतू मुळे शेतकरीवर्ग, मच्छिमार आणि आदिवासी हेबधीत झाले आहेत त्यांना त्यांच्या हक्काची नुकसानभरपाई मिळणे हा त्यांचा हक्क आहे,मीत्याना समजून सांगितले या सागरी सेतूमुळे कोकणचा काय पालट होईल हा सेतू झाला तर कोकणचा विकास होईल या सेतूमुळे जे बधीत झाले आहेत त्यांना नुकसानभरपाई मिळाली पाहिजे राज्य सरकारने नुकसान भरपाईचा निधी हा रायगडच्या जिल्हाधिकारी यांच्या कडे सपुर्द केलाय मी जिल्हाधिकारी रायगड यांना विनंती केली आहे की हा निधीचा वाटप योग्य व 10 दिवसात त्वरित देण्यात यावा,परंतु हा निधी अजूनही बधीतांकडे पोहचलेला नसल्याने रेवस-करंजा सागरीसेतू मुळे बधीत असणारा शेतकरीवर्ग, मच्छिमार आणि आदिवासी यामध्ये संतापाची लाट उसळली आहे.

**करंजा रोडला जे आयवा डंपर चालतात त्याच्याकडे कोणाचे लक्ष आहे की नाही किती वेगाने चालतात कोणाचा अपघात झाल्यावर नंतर बोंबलाला, कंपनीला करंजा रेवस-सेतूचे 20 टक्के काम डिसेंबर2025 पर्यंत पुर्ण करायचं आहे, त्यांना लोकांच्या जीवाशी काही देणं घेणं नाही.उलट जर अपघातात कोणाचा जीव गेल्यास त्याला ते नुकसान भरपाई देतील.अशी मुजोरीची भाषा कंपनीची आहे. करंजा रेवस ब्रिज संदर्भात मच्छिमार, शेतकरीवर्ग आणि बाधितांना नुकसान भरपाई मिळणे बाबत 29 ऑक्टोबर रोजी दुपारी 3,30 वाजता विधानभवनात बैठक बोलाविण्यात आली आहे.**

**श्री.सचिन डाऊर**
**सामाजिककार्यकर्ते करंजागाव-उरण**

# राजकारणात स्वच्छता आणि परिवर्तन घडवायचे असेल तर तरुणांनो राजकारणात सहभागी व्हा-बाबाराव पाटील खडसे यांचे आव्हाहन

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम:-**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाज कारणात रस असणाऱ्या, शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेसाठी काहीतरी करण्याची इच्छा असलेल्या तरुणांनी अल्पसंख्यांक व शेवटच्या घटकाला संवाद घेऊन जाणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) मध्ये सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी केले.



बाबाराव पाटील खडसे हे पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते असून पक्षाची स्थापना झाल्यापासून त्यांनी आपल्या निष्ठा, प्रामाणिकपणा आणि अनुभवाच्या जोरावर पार्टी साथ दिली आहे. दिला अनेक वर्षापासून त्यांनी प्रत्येक लहान मोठ्या कामात प्रामाणिकपणे योगदान दिले आहे. शरद पवार हे बहुजन विचारसरणीशी जोडलेले नेते आहेत. जात, धर्म किंवा सामाजिक स्तर यावर न पाहता कामाला प्राधान्य देतात. महाराष्ट्र मध्ये आजही कोणत्याही जिल्ह्यात गेले तर त्याचे केलेली कामे बोलतात परिवर्तन घडवायचं असेल, तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत निवडणूक लढवण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) हा एक सक्षम आणि विश्वसनीय पर्याय आहे.

त्यामुळे ज्यांची निवडणूक लढवण्याची इच्छा असेल त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्याशी संपर्क साधावा.

# शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा सरकारचा प्रयत्न - शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून जुलमी महायुती सरकारचा निषेध!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

**यवतमाळ :** राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने दुर्लक्ष होत असताना,आता शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचे प्रकार सुरू झाल्याचा आरोप शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

आज दिनांक २६ ऑक्टोबर (रविवार) रोजी सायंकाळी साधारणपणे चारच्या सुमारास यवतमाळ शहरातील शिवनेरी हॉटेलसमोर,स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने शेतकरी चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते प्रा.पंढरी पाठे तसेच कृष्णा पुसनाके,कॉम्रेड सचिन मनवर,यांना राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना (शिंदे गट) प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या यवतमाळ दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर फौजफाट्यासह स्थानबद्ध (डिटेन) करण्यात आले.

प्रा.पंढरी पाठे हे गेल्या अनेक दिवसांपासून शेतकरी चळवळीतील एक सक्रीय,आक्रमक आणि जनतेच्या हक्कांसाठी लढणारे कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात.त्यांनी शेतकऱ्यांच्या



**“शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आवाज उठवणे हा गुन्हा नाही.आम्ही सरकारविरोधी नाही,अन्यायविरोधी आहोत.पण आजचं सरकार सत्य सांगणाऱ्यांना डिटेन करून गप्प बसवू पाहतंय.आम्ही घाबरणार नाही.शेतकऱ्यांच्या लढ्याला अटक नाही,सत्याला अडथळा नाही.”**

कर्जमाफी,पिकांच्या हमीभाव,विमा अडचणी आणि शेतीतील नुकसानभरपाईसाठी सतत आंदोलने,निवेदने आणि प्रत्यक्ष कृती केली आहे. एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांना अडवण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

या कारवाईचा शेतकरी,विद्यार्थी आणि जनतेच्या आवाजावर गदा आणणारा व लोकशाही मूल्यांना बाधा पोचवणारा म्हणून विविध सामाजिक संघटनांकडून तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. यामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,तसेच संपूर्ण महायुती सरकारवर लोकशाहीचा गळा घोटल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या लढ्याला अटक नाही.सत्याला अडथळा नाही!

यवतमाळसह संपूर्ण विदर्भात या घटनेविरोधात संताप व्यक्त केला जात असून,जुलमी महायुती सरकारचा निषेध वाढत आहे.

# नवलाई कोतवाल संस्थेचा उपक्रम - शिक्षणातून उजळली दिवाळी

**“दानातून आनंद” उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप — नवलाई कोतवाल कला व क्रीडा सामाजिक संस्थेचा उपक्रम**

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर , मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुरबाड :** समाजातील उपेक्षित घटकांसाठी दिवाळीचा खरा अर्थ जपत नवलाई कोतवाल कला व क्रीडा सामाजिक संस्था (रजि.) तर्फे “दानातून आनंद” या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत जि. प. शाळा, खेड (केंद्र वेलूक), आदिवासी पाडा, मुरबाड येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल, पेन, पट्टी, पाऊच, रुमाल आदी आवश्यक साहित्य देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य पाहून सर्व सदस्यांना खऱ्या अर्थाने दिवाळीचा उत्सव अनुभवता आला.

संस्थेचे अध्यक्ष श्री. सुजित दिपक शिंदे यांनी सांगितले की, “आमच्या छोट्याशा प्रयत्नातून या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात थोडा प्रकाश पाडता आला, हेच आमच्यासाठी मोठे समाधान आहे. दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे इतरांच्या आयुष्यात उजेड निर्माण करणे, हेच आम्ही या उपक्रमातून साध्य करण्याचा प्रयत्न करतो.”

उपक्रमात संस्थेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उत्साहाने सहभागी झाले. या सामाजिक कार्यासाठी शाळेच्या शिक्षकांनी व ग्रामस्थांनी संस्थेच्या कार्याचे



कौतुक केले.


शाळेच्या शिक्षकांनी सांगितले की, “या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड आणि आत्मविश्वास वाढला असून, दिवाळीचा आनंद अधिक रंगतदार झाला आहे.”

संस्थेच्या पुढील नियोजनामध्ये ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी अशाच शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.

संस्थेच्या सर्व सदस्यांचे उत्साही योगदान आणि सामाजिक बांधिलकी यामुळेच या उपक्रमाला यश लाभले.यंदाची दिवाळी फक्त प्रकाशाचीच नाही, तर शिक्षणाचीही बनली! श्री. सुजित दिपक शिंदे, अध्यक्ष नवलाई कोतवाल कला व क्रीडा सामाजिक संस्था (रजि.) यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

# स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत आदिवासी कृती समिती ठरेल गेम चेंजर

## उमरखेड तालुक्यात 50 हजाराच्या वर आदिवासी मतदान



**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**
**राजु गायकवाड**

उमरखेड तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी समाजाचे विविध कार्यक्रम आदिवासी कृती समितीच्या वतीने घेण्यात आले त्यात मागील महिन्यात झालेला आदिवासी मोर्चा हा उमरखेड च्या इतिहासतील सर्वात मोठा मोर्चा म्हणून त्याची नोंद पण घेण्यात आली समाजासाठी पूरक आणि समाजाच्या हिताचे लोक सत्तेत आले पाहिजे यासाठी आदिवासी कृती समितीच्या वतीने नींगनूर येथे आदिवासी समाजाची बैठक घेतली.

या बैठकीला तालुक्यातील आदिवासी समाजाचे सर्व समाजसेवी व कार्यकर्ते बैठकीस हजर होते. बैठकीतील एकमुखी निर्णयाप्रमाणे महामानव तंट्याभिल- बिरसावादी पॅनल तयार करून अपक्ष निवडनूक लढण्याचे सर्वानुमते ठरले आहे. त्यामूळे निवडनूक रंगतदार होण्याची परिस्थिती उभी होईल असे वाटते.

निवडनूक लढविण्यासाठी साफ सुत्री चेहरा असनाऱ्या उमेदवारांची चाचपणी समीतीकडून सुरू आहे. उमेदवार फायनल करन्यासाठी सुकानू समीतीचे गठण करण्यात आले.

**आदिवासी समाजाचा वापर राजकारणी लोक आजपर्यत घेत आले आहेत आणि आदिवासी समाजाच्या नेहमी विरोधात बोलत राहिले आजपर्यत हे भोळ्या आदिवासी समाजाने सहन केले पण या नंतर आदिवासी समाज जो आदिवासीच्या हक्कासाठी न्यायासाठी काम करेल त्याच्या साठी च उभा राहील हे लक्षात ठेऊन या वेळी आदिवासी समाज हा मतदान करेल आणि त्यासाठी आदिवासी सुकानू समितीची रचना करण्यात आली आहे लवकरच समिती ॲक्शन मोड वर येईल..**

**उत्तम पांडे**
**माजी तहसीलदार तथा अध्यक्ष**
**आदिवासी कृती समिती, उमरखेड**

# नेवाशात काँग्रेस स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक स्वबळावर लढण्याच्या तयारीत

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधी :- लखन वाल्हेकर**

नेवाशात काँग्रेस पक्ष येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका स्वबळावर लढण्याच्या तयारीत असल्याचे काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी स्पष्ट केले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा बिगुल वाजला असून सर्वच पक्ष आपापल्या परीने तयारीला लागले आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत या निवडणुकीच्या तयारीसाठी पक्ष पातळीवर बैठका सुरु झाल्या आहेत.नुकत्याच काँग्रेस पक्षाच्या झालेल्या जिल्हा स्तरीय बैठकीत नेवासा काँग्रेस पूर्ण ताकतीने स्वबळावर निवडणूक लढविण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट मत काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी मांडले. नेवासा तालुक्यात जिल्हापरिषदेचे सात गट व पंचायत समितीचे चौदा गण या एकवीस जागा लढविण्याची तयारी पक्षाची असून नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदासह सतरा जागा लढविण्याची तयारी काँग्रेसची असल्याचे मत माळवदे यांनी स्पष्ट केले. यासाठी लवकरच इच्छुक उमेदवाराच्या मुलाकती घेण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक ही कार्यकर्त्यांची निवडणूक असून सामान्य कार्यकर्त्यास संधी मिळाली पाहिजे इतर पक्षांच्या आघाडीमुळे काँग्रेस कार्यकर्त्यावर नेहमी अन्याय होत आला आहे. इतर पक्षाशी केलेल्या आघाडीमुळे काँग्रेसची राष्ट्रीय ओळख संपुष्टात आल्याचे मत माळवदे यांनी मांडले. येत्या दोन दिवसात काँग्रेस पक्ष निरीक्षकांची नेवाशांत बैठक होणार असून त्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते पूर्ण तयारीला लागतील अशी माहिती माळवदे यांनी दिली.



**"नगरपंचायतवर काँग्रेसचा झेंडा फडकविणार"**
**गेल्या पाच वर्षात नेवासा शहरात काँग्रेस पक्षाने नागरिकांच्या विविध प्रश्नावर आवाज उठवून अनेक प्रश्न सोडविले उत्कृष्ट पक्ष संघटन बांधणी केली. सर्व जाती धर्मातील नागरिकांना सोबत घेत काम केले. यापुढेही नागरिकांना न्याय देणार. येणाऱ्या निवडणुकीत नक्कीच जनता काँग्रेसच्या पाठीशी उभी राहील. नगराध्यक्ष हा काँग्रेसचाच होईल. नेवासा नगरपंचायतवर काँग्रेसचा झेंडा फडकणार**
**- अंजुम पटेल शहराध्यक्ष काँग्रेस कमिटी.**

**"पंचायत समितीवर काँग्रेसचाच झेंडा फडकणार"**
**काँग्रेस पक्षाची स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व जागा स्वबळावर लढविण्याची पूर्ण तयारी आहे. लवकरच इच्छुकांच्या मुलाकती घेण्यात येणार आहेत. यानिमित्ताने सर्वसामान्य कार्यकर्त्यांना राजकारणात येण्याची संधी निर्माण करून देण्यात येईल. जनतेचा वाढता कल पाहता पंचायत समितीवर देखील काँग्रेसचा झेंडा फडकला जाईल.**
**- संभाजी माळवदे,अध्यक्ष काँग्रेस कमिटी.**

# आष्टी तालुक्याची कामधेनू असलेल्या महेश सहकारी साखर कारखान्याचा परवाना तात्काळ पुनर्स्थापित करा

## ३१ ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

आष्टी तालुक्याची कामधेनू म्हणून ओळख असलेल्या महेश सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी मा. आ.भीमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने कर्ज रक्कम भरून कारखाना सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या होत्या.कारखान्याचे यंदा धुराड पेटवण्याच्या दृष्टीने प्रगतीपथावर कामकाज सुरू झाले होते.परंतु राज्य व केंद्र सरकारने परवाना रद्द केला असून रद्द केलेला परवाना पूनर्स्थापित करा या मागणीसाठी कार्यक्षेत्रातील सभासद, ऊसउत्पादक,शेतकरी व संचालक मंडळ यांचे मा.आमदार भीमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली ३१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक यांच्याकडे २६ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनद्वारे दिला आहे. दिलेल्या निवेदनामध्ये नमूद आहे.की महेश सहकारी साखर कारखाना बीड, अहिल्यानगर,धाराशिव ७ तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मोठा वर्ग या कारखान्यावर अवलंबून असून मोठ्या प्रमाणावर दुष्काळी आष्टी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आष्टी तालुक्याला मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार होता.अनेक बेरोजगार तरुणांच्या हाताला काम लागले असते परंतु राज्य व केंद्र



शासनाने या कारखान्याचा परवाना रद्द केला आहे. कारखान्यावरती असलेले बँकेचे कर्ज माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने नेल करून कारखान्याचे धुराडे पेटवण्याच्या दृष्टीने कामकाज प्रगतीपथावर सुरू करण्यात आले होते.परंतु सरकारने हा परवाना रद्द केल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. कारखाना कार्यरत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असून इतर कारखाने हंगाम सुरू करण्याच्या तयारीत असताना देखील आमच्या कारखान्याचे सर्व काम ठप्प झाले आहे.याच पार्श्वभूमीवर मा.आ.भिमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्षेत्रातील सभासद,ऊस

उत्पादक शेतकरी ३१ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

## कोकण सुपुत्र कवी अशोक लोटणकर यांना कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठानचा साहित्य गौरव पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील साखरपा शहरामधील मुर्शी गावचे सुपुत्र, मुलुंड येथे वास्तव्यास असलेले लेखक, कवी श्री.अशोक लोटणकर यांना नुकताच कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठानचा साहित्य गौरव पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक आणि माजी संमेलनाध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते मंचर पुणे येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.या वेळी सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

लोटणकर यांच्या अक्षरनामा या काव्य संग्रहास हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून या काव्य संग्रहाला मिळालेला हा सहावा पुरस्कार आहे. कविता, कथा, ललित, बाल साहित्य, ब्रेल लिपी इ. स्वरुपाची एकूण २१ पुस्तके त्यांची प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांच्या साहित्यकृतींना मानाचे ३० हून अधिक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.त्यात कोकण साहित्य रत्न पुरस्कार, दादा गावकर सामाजिक प्रतिष्ठान पुरस्कार, एकता कल्चरल अकादमीचा नारायण सुर्वे पुरस्कार, कवी कुसुमाग्रज पुरस्कार इ.चा



समावेश आहे.लोटणकर हे सातव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिले आहेत.ते बेस्ट मधून आगार व्यवस्थापक या पदावरून सेवानिवृत्त झालेले असून ते अनेक सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्थांशी संबंधित आहेत.रत्नागिरी जिल्ह्यातील साखरपा- मुर्शी गावचे सुपुत्र लोटणकर यांना पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर, पत्रकार, वृत्तपत्र लेखक,ग्रामीण मंडळ, विविध संस्था,प्रतिष्ठान पदाधिकारी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# विघ्नेश सावंत यांची अंधेरी तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**राकेश रमेश पाटील, मुंबई प्रतिनिधी**

**मुंबई :** समाजातील उपेक्षित घटकांसाठी, पत्रकारांच्या हक्कांसाठी तसेच पारदर्शक शासनव्यवस्थेसाठी कार्यरत असलेल्या माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिस मित्र समिती या संस्थेच्या अंधेरी तालुका (मुंबई उपनगर) उपाध्यक्षपदी विघ्नेश विलास सावंत यांची निवड करण्यात आली आहे.

संस्थेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री. महेश सारणिकर साहेब यांच्या स्वाक्षरीने ही नियुक्ती १ सप्टेंबर २०२५ रोजी अधिकृतरित्या जाहीर करण्यात आली. संस्थेचे राज्य सचिव श्री विनोद गायकवाड,



राज्य कार्याध्यक्ष श्री सखारामपंत कुलकर्णी, राज्य संपर्कप्रमुख श्री विकास गोरवाडकर यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार, विघ्नेश सावंत हे सामाजिक क्षेत्रात सक्रिय कार्यकर्ते असून, त्यांनी गेल्या काही वर्षांत सामाजिक न्याय, युवक संघटन, पर्यावरण संवर्धन, तसेच स्थानिक प्रशासनाशी संवाद या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे.

त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याचा गौरव म्हणूनच ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीच्या कालावधीत सावंत अंधेरी तालुक्यातील नागरिकांमध्ये संवाद दृढ करणे, माहिती अधिकार जनजागृती, पत्रकार संरक्षण व नागरिकांच्या तक्रारी निवारणासाठी कार्यरत राहणार आहेत. समितीमार्फत पारदर्शक शासनव्यवस्था, लोकशाही मूल्यांची जोपासना आणि पोलीस-जनता संवाद वाढविणे हे मुख्य उद्दिष्ट राहील.

राज्य अध्यक्ष महेश सारणिकर म्हणाले, "विघ्नेश सावंत यांच्या नेतृत्वाखाली अंधेरी विभागातील संघटनात्मक कामकाज अधिक सक्षमपणे राबवले जाईल. समाजातील घटकांना जोडणारे आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करणारे काम सावंत समर्थपणे करतील,"

त्याचबरोबर मुंबई जिल्हा उपाध्यक्ष श्री. किशोर रमाकांत गुडेकर यांनीही या नियुक्तीबद्दल कौतुक व्यक्त केले व विघ्नेश सावंत यांच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नियुक्तीनंतर विघ्नेश सावंत यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "संस्थेने माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी मनापासून आभार मानतो. सामान्य नागरिकांचे हक्क, पत्रकारांचे संरक्षण आणि प्रशासनातील पारदर्शकता यासाठी मी सदैव तत्पर राहीन."

# तुलाभार कार्यक्रमात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची मोफत पुस्तके वाटप

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकरशिरूरआनंतपाळ :**

तालुक्यातील येरोळ गावचे सरपंच सतिस सिंदाळकर यांच्या आईने चारधाम यात्रा करुन आल्याबदल त्यांची आई अनुसयाबाई सिंदाळकर यांची तुलाभार करुन लोकसेवा आयोगाची परिक्षा देणाऱ्या विद्यार्थाना एमपीएससी, युपीएससी स्पर्धा परीक्षा तथा सरळ सेवा भरती परीक्षांचे पुस्तके येथील जि.प.प्रशाला व जिजामाता विद्यालयाती विद्यार्थाना मु.अ. मार्फत मोफत वाटप करण्यात आली.

ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा अधिकारी व्हावेत शिक्षणात त्यांची प्रगती व्हावी या उद्देशाने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेची पुस्तके संबंधीत विद्यालयाच्या मु.अ.व प्राचार्यांना सुपूर्द करण्यात आली. ही पुस्तके विद्यार्थ्यांना गावातील विद्यालय व जि.प. प्रशाले मध्ये उपलब्ध होतील व ते स्पर्धा



परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थाना घरी राहून अभ्यास करू शकतील. त्याच प्रमाणे विद्यार्थी स्कॅनरच्या माध्यमातून आभासी पद्धतीने पुणे येथील नामवंत क्लासचे ज्ञान घेऊ शकतील.

या प्रसंगी मा.मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी नक्की अधिकारी बनतील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी उद्योजक राजकुमार हैबतपुरे, लातुर जि.प,चे मुख्य बांधकाम अभियंता डी.आर.मुकदम गावातील प्रतीष्टीत नागरिक व शिक्षणप्रेमी विद्यार्थी उपस्थित होते.

## ओबीसी नेते रामप्रसाद थोरातांचा तळणीत सत्कार; वंचित बहुजन आघाडीचा स्वबळावर लढण्याचा गर्जनादायक इशारा!

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक राजु शिंदे :**

तळणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धविहार परिसरात वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष व ओबीसी नेते रामप्रसाद थोरात यांचा दलित व ओबीसी बांधवांच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. या प्रसंगी थोरात यांनी सत्ताधारी तसेच विरोधकांवर जोरदार टीका करत, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये "वंचित बहुजन आघाडी स्वबळावर लढणार" असा गर्जनादायक इशारा दिला.

थोरात म्हणाले, "ओबीसींचा डीएनए सत्तेत गेला, पण दबावाखाली झुकला. विरोधकही




दुहेरी भूमिकेत आहेत. श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता, गरजू मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण देण्याची ठाम व स्पष्ट भूमिका मांडली आहे. मात्र काही नेते ओबीसी नेतृत्व संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण आता ओबीसी, दलित, मुस्लिम आणि मागास समाज सज्ज आहे — संघर्ष टाळता येणार नाही."

ते पुढे म्हणाले, "आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी स्वतंत्र उमेदवार उभे करणार आहे. अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून, गोरगरिबांना सत्तेच्या केंद्रस्थानी आणण्याची हीच योग्य वेळ आहे."

या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे जालना जिल्हा उपाध्यक्ष भारत उघडे, जिल्हा महासचिव डॉ. किशोर त्रिभुवन, परतूर शहराध्यक्ष स्वप्निल पहाडे, तसेच दीपक हिवाळे, राहुल पहाडे, नारायण हाकरणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

तळणी व परिसरातील प्रल्हाद राऊत, किशोर सदावर्ते, अंकूश खरात, अक्षय राऊत, अनिल सदावर्ते, गजानन खरात, रतन मस्के, भागवत येऊल, गुलाब सदावर्ते, शौकत कुरेशी, संतोष सदावर्ते, बाळू सदावर्ते, इंद्रकांत मगर, रतन उघडे, बाळू मगर, देविदास उघडे, राहुल सदावर्ते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## दिबां'च्या नावासाठी पाठपुरावा सुरूच ठेवणार

### विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचा बैठकीत निर्धारप



**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची बैठक रविवारी वाशी येथील नवी मुंबई स्पोर्ट्स क्लबमध्ये झाली. या वेळी 'दिबां'च्या नावासाठी पाठपुरावा सुरूच ठेवण्याचे सर्वानुमते ठरले. या संदर्भात कृती समितीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.या बैठकीस कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार जगन्नाथ पाटील, जे.एम. म्हात्रे, सरचिटणीस दीपक म्हात्रे, सहचिटणीस संतोष केणे, राजेश गायकर, खजिनदार जे.डी. तांडेल, सदस्य 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, दशरथ भगत, रूपेश धुमाळ, अ‍ॅड. भारद्वाज चौधरी, सुरेश पाटील, राजाराम पाटील, विजय गायकर यांच्यासह इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे यासाठी राज्य सरकारने ठराव मंजूर करून केंद्र सरकारला पाठवलेला आहे. याबाबत केंद्रातील मोदी सरकारही अनुकूल असल्याचे काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले होते. याच अनुषंगाने पुढे पाठपुरावा करण्याचे वाशी येथील बैठकीत ठरले.

## संतोष खारवणे यांना तिकीट मिळावे – सामान्य जनतेतून वाढता पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक:- राजू शिंदे.**

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आकणी पंचायत समीती मधून शिवसेना पक्षाने युवा नेतृत्व श्री.संतोष खारवणे यांना पक्षाने तिकीट द्यावे व त्यांच्यामध्ये निवडूण येण्याची क्षमता आहे, अशी भावना सामान्य जनतेतून व्यक्त होत आहे. श्री.संतोष खारवणे यांनी गेल्या काही वर्षांत केलेल्या प्रामाणिक व जनतेसाठी कामामुळे त्यांच्याविषयी विश्वास व आपुलकी निर्माण झाली आहे.

शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच समाजातील सर्व घटकांचे प्रश्न सोडवण्यामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. प्रत्येक समस्येकडे समर्पितपणे पाहून



त्यावर योग्य तोडगा काढण्याचा त्यांचा प्रयत्न लोकांना आश्वस्त करणारा ठरला आहे. त्यामुळे "संतोष खारवणे यांनाच तिकीट मिळावे, त्यांनाच निवडून आणावे" अशी मागणी गावोगावी ऐकायला मिळते.जनतेमध्ये वाढत्या चर्चांमुळे संतोष खारवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला जात असून, ते पुन्हा एकदा मतदारांचा विश्वास संपादन करून पुढे येतील, असा आशावाद सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

## तरुण युवक दिलीप खंदारे उमेदवारीच्या रिंगणात!

**दैनिक युवक आधार**
**मुबंई (प्रतिनिधी )**

आजची तरुणाई काही करत नाही, त्यांना समाजकारण, राजकारण यांत काही रस वाटत नाही. फक्त पार्टीमध्ये आजची तरुणाई मश्गूल आहे. समाजव्यवस्थेचे त्यांना भान नाही.' अशा तथाकथित मताला छेद देत भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ कार्यकर्ते दिलीप खंदारे यांनी गेल्या १० वर्षाहून अधिक काळापासून धारावीतील वार्ड क्रमांक १८६ मध्यें आपल्या कामाचा ठसा उमटवीला आहे.

गेल्या १० वर्षांपासून त्यांनी धारावीत विशेषतः वार्ड क्रमांक १८६ मध्ये हजारो नागरिकांना भाजपचे सदस्य तर बनविले शिवाय मोदींचे विचार त्यांचे कार्य घराघरात पोहचविण्याचे काम केले आहे.त्यांनी संपूर्ण वार्ड पिंजून काढला असून वयक्तिकरित्या आपला माणूस म्हणून त्यांना समाजात मान सन्मान आहे.

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुका लवकरच जाहीर होणार असून भाजपाचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हूणन वार्ड क्रमांक १८६ मधून त्यांनी आपली दावेदारी पक्की केली आहे. दिलीप खंदारे यांना धारावीतील तरुण युवकां बरोबर पक्षातील कार्यकर्ते, नेते यांचा पाठिंबा असून वार्ड क्रमांक १८६ मधून निवडणुकीच्या रिंगणात भाजप त्यांना उतरविण्याची दाट शक्यता असून नवोदिताचे मात्र धाबे धनाणले आहे.

पक्षातून मिळत असलेल्या वाढत्या पाठीब्याने दिलीप खंदारे यावेळी वार्ड क्रमांक १८६



मधून निवडणुकीच्या रिंगणात तर उतरतील शिवाय धारावीत या वार्डातून पहिला नगरसेवक भाजपाचा झालेला पाहायला मिळेल यात नक्की शंका नाही.

त्यांनी १० वर्षाहून अधिक काळ या वार्डात भाजपचे पाळे मुळे रोवण्याचे केलेले प्रामाणिक काम तसेच जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांचा प्रयत्न हाक त्याचे फळ म्हणून जनता त्यांना निवडून देतील.

# मुंबई महापालिका निवडणुकीत महायुती राहिल एकजुट

## महाविकास आघाडीत पडली आहे फूट - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**
**सहसंपादक मुकुंद कांबळे**

**मुंबई :** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकित भाजप,शिवसेना,राष्ट्रवादी,रिपब्लिकन पक्ष या पक्षाच्या महायुतीची अभेद्य एकजुट राहणार आहे.महायुती राहिल एकजुट पण मनसेमुळे महाविकास आघाडीत पडली आहे फुट असा टोला रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज महाविकासआघाडीला लगावला.

आगामी मुंबई महानगरपालिका आणि राज्यातील सर्व महानगरपालिका; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकित महायुतीची भक्कम एकजुट राहणार आहे. मनसे हा पक्ष जर महाविकास आघाडीत येत असेल तर कॉंग्रेस पक्ष वेगळी निवडणुक लढवेल . त्यामुळे महाविकास आघाडी मध्ये फुट पडेल हा आपला यापूर्वीच सांगितलेला अंदाज खरा ठरल्याचे ना.रामदास आठवले यांनी सांगितले.

मनसे आणि उबाठा यांच्या युतीमुळे महाविकास आघाडी मध्ये फुट पडलेली आहे. त्यामुळे राज्यातील सर्व स्थानिक संस्थाच्या



निवडणुकीत; मुंबई महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाला सामोरे जावे लागते.महायुती ही एकजुट भक्कम असल्यामुळे मुंबई महानगरपालिकेत महायुतीचा महापौर निवडून येईल. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीला भरघोस मतदान मिळणार आहे. फूट पडलेल्या महाविकास आघाडीला पराभवाला सामोरे जावे लागेल असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

दरम्यान सातारा जिल्हातील फलटण तालुक्यात महिला डॉक्टरने केलेली आत्महत्या अत्यंत दुःखद आणि गंभीर प्रकार आहे. महाराष्ट्राच्या प्रतिमेला कंलक फासणारी घटना आहे.महिला डॉक्टर वर ज्यांनी अत्याचार केले ; ज्यांच्यामुळे महिला डॉक्टरला आत्महत्या करण्याची वेळ आली त्या सर्व आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे.सातारा ही छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी आहे.या ऐतिहासिक जिल्ह्यात अशी घटना घडणे अत्यंत निषेधार्ह आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात बलात्कार करणाऱ्या दोषी आरोपींचे हातपाय तोडून कडेलोट करण्याची शिक्षा केली जात होती.तशीच शिक्षा बलात्कार करणाऱ्यांना केली तर समाजात बलात्काराचे प्रकार मोठ्या प्रमाणात रोखता येतील असे मत ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केले.


फलटणमधील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी या प्रकरणी गांर्भीयांने लक्ष घातलेले आहे. लवकरच या प्रकरणी दिवगंत महिला डॉक्टरला न्याय मिळेल असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

# शेतकऱ्यांना मदतीचा हात-पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीचा उपक्रम कौतुकास्पद

## ५१ हजारांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी प्रदान संचालक रजनीकांत बोरेले,विजय चव्हाण यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे**

**पांढरकवडा :**अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत अत्यंत संवेदनशील पाऊल उचलले आहे. समितीच्यावतीने ५१ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्यात आला.हा धनादेश अपक्ष संचालक व व्हिसल ब्लोअर रजनीकांत डालूरामजी बोरेले आणि संचालक व समन्वयक जनता पार्टी नेते विजय चव्हाण (मारेगाव) यांच्या हस्ते जिल्हा निबंधक अधिकारी,यवतमाळ यांना प्रदान करण्यात आला.या मदतीची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात आली असून ती शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरली जाणार आहे, अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे पिकांचे प्रचंड नुकसान



झाले आहे,यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी ही 'काळी दिवाळी' ठरली असताना, बाजार समितीने "फुल नाही पण फुलाची पाकळी" म्हणून ही आर्थिक मदत दिली.समितीची आर्थिक स्थिती अत्यंत मर्यादित असतानाही शेतकऱ्यांच्या दु:खात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याने सर्वत्र कौतुक व्यक्त होत आहे.या उपक्रमामागे सभापती विनोद डंभारे, उपसभापती संजय नईनवार, संचालक व शिवसेना नेते हरीहर लिंगनवार यांची प्रमुख भूमिका राहिली आहे.तसेच या उपक्रमाला पालकमंत्री संजय राठोड (शिंदे शिवसेना गट) व खासदार प्रतिभा धानोरकर (कॉंग्रेस) यांचे मार्गदर्शन लाभले.धनादेश सुपूर्द केल्यानंतर रजनीकांत बोरेले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले."शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे.

शेतकरी संकटात असताना आपण सगळ्यांनी एकत्र उभं राहणं हीच खरी सेवा आहे.या कार्यात सहभागी होण्याची संधी दिली व धनादेश माझ्या हस्ते दिल्याबद्दल मी सभापती विनोद डंभारे,विजय चव्हाण,राकेश नेमणवार,संतोष बोडेवार,सचिव सुरेश खानदानकर यांच्यासह समितीचे सर्व संचालक यांचा आभारी असल्याचे मत व्यक्त केले आहे,शेतकऱ्यांच्या संकटकाळात साथ देणारा हा संवेदनशील उपक्रम सहकार भावनेचा उत्तम आदर्श म्हणून पुढे आला आहे.